# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग



## वार्षिक अहवाल २०१५-२०१६

मविनिआ

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

## वार्षिक अहवाल
## २०१५-२०१६

# अनुक्रमणिका


१. आयोगाची स्थापना व कार्ये ........ १

२. आयोगाचा संरचनात्मक तक्ता ........ २

२.१ आयोगाच्या आस्थापनेवरील कर्मचारी ........ २

२.२ सल्लागार ........ ३

२.३ अध्यक्ष व सदस्य ........ ३

३. राज्य सल्लागार समिती ........ ४

४. महाराष्ट्राच्या विद्युत क्षेत्रातील परिस्थिती ........ ५

४.१ वीज निर्मिती ........ ५

४.२ विजेचे पारेषण ........ ६

४.३ विजेचे वितरण ........ ७

४.४ नूतनशील ऊर्जा ........ ८

५. महत्त्वाचे प्रश्न ........ ९

५.१ नूतनशील ऊर्जेच्या वाढीस चालना देणे ........ ९

५.२ वीज मागणी व्यवस्थापन ........ १०

५.३ पारेषण नियोजन ........ १२

५.४ मंजूर केलेले परवाने ........ १४

६. वीज दराचे व अन्य निवडक आदेश ........ १५

७. विनियम आणि कार्यप्रणाली निर्देश ........ ३०

७.१ विनियम ........ ३०

७.२ कार्यप्रणाली निर्देश........ ३५

८. ग्राहक गाऱ्हाणे निवारण यंत्रणा ........ ३६

८.१ ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच ........ ३६

८.२ विद्युत लोकपाल ........ ३८

८.३ प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधी ........ ३९

९. वार्षिक लेखे - एक दृष्टीक्षेप ( आर्थिक वर्ष २०१५-१६ ) ........ ४०

**परिशिष्ट - १ :** आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये आयोगाने पारित केलेले आदेश ........ ४३

**परिशिष्ट - २ :** दिनांक ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या वर्षासाठी आय-व्यय लेखा ........ ५०

# १. आयोगाची स्थापना व कार्ये

विद्युत नियामक आयोग अधिनियम, १९९८ च्या अंतर्गत महाराष्ट्र शासनाने दिनांक ५ ऑगस्ट, १९९९ च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाची स्थापना केली असून आयोगात अध्यक्ष व दोन सदस्य आहेत. आयोगाकडे (एक) अर्ध-न्यायिक, (दोन) अर्ध-वैधानिक आणि (तीन) कार्यकारी स्वरुपाची कामे सोपविण्यात आली आहेत. सदर अधिनियमांतर्गत आयोगाकडे सुरुवातीला खालील कार्ये सोपविण्यात आली होती :-

अ) राज्यातील घाऊक, ठोक, ग्रिड किंवा किरकोळ वीज विक्रीचे दर निश्चित करणे;

ब) पारेषण सुविधेचा वापर करण्यासाठी पारेषण दर निश्चित करणे;

क) राज्यातील विजेचे पारेषण, विक्री, वितरण आणि पुरवठा करण्यासाठी निर्मिती कंपन्या, किंवा अन्य स्त्रोतांकडून ज्या किंमतीने वीज प्राप्त करुन घेण्यात येईल त्या किंमतीसह पारेषण कंपन्या आणि वितरण कंपन्यांच्या विजेची खरेदी आणि वीज प्राप्त करुन घ्यावयाच्या प्रक्रियेचे नियमन करणे;

ड) या अधिनियमाची उद्दिष्टे व हेतू साध्य करण्यासाठी वीज उद्योगात स्पर्धा, कार्यक्षमता व काटकसरीस चालना देणे.

विद्युत अधिनियम, २००३, जून, २००३ मध्ये अंमलात आल्यानंतर विद्युत नियामक आयोग अधिनियम, १९९८ रद्द झाला व आयोगाकडे खालील अन्य अतिरिक्त कार्ये सोपविण्यात आली :-

अ) विजेचे राज्यांतर्गत पारेषण व वहन सुकर करणे;

ब) विजेचे पारेषण, वितरण आणि विजेचा व्यापार करण्यासाठी परवाना देणे;

क) नूतनशील उर्जा स्त्रोतांपासून सह-निर्मितीस आणि वीज निर्मितीस चालना देणे;

ड) परवानाधारक आणि वीज निर्मिती कंपन्या यांच्यामधील आणि परवानाधारकांमधील आप-आपसातील वादासंबंधी अभिनिर्णय देणे आणि कोणताही वाद लवादाकडे संदर्भ करणे;

इ) या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता शुल्क लावणे;

फ) राज्य ग्रिड संहिता विनिर्दिष्ट करणे;

ग) परवानाधारकांच्या सेवेची गुणवत्ता, सातत्य व विश्वासार्हता यांची मानके विनिर्दिष्ट करणे किंवा अंमलात आणणे;

ह) राज्यांतर्गत विजेच्या व्यापारासाठी, आवश्यकता असल्यास, नफ्याचे प्रमाण निश्चित करणे;

ज) या अधिनियमाखाली सोपविण्यात येतील अशी अन्य कार्ये पार पाडणे;

य) विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६(२) अंतर्गत राज्यशासनास सल्ला देणे.

# २ आयोगाचा संरचनात्मक तक्ता

## २.१ आयोगाच्या आस्थापनेवरील कर्मचारी

महाराष्ट्र शासनाने विद्युत नियामक आयोग अधिनियम, १९९८ अंतर्गत आयोगावर सोपविण्यात आलेली कार्ये पार पाडण्यासाठी आयोगाच्या आस्थापनेवर सुरुवातीला जून, २००० मध्ये २४ पदे मंजूर केली. त्यानंतर, मार्च, २०१० मध्ये आयोगावर विद्युत अधिनियम, २००३ अंतर्गत सोपविण्यात आलेल्या व्यापक कार्यांतून निर्माण झालेली वाढीव कामे पार पाडण्यासाठी शासनाने आयोगास अतिरिक्त ३९ पदे मंजूर केली. या पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

### ३१ मार्च, २०१६ रोजीची कर्मचाऱ्यांची माहिती

| अनु क्रमांक | पदाचे नांव | मंजूर पदांची संख्या | भरलेली पदे | | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| | | | नामनिर्देशाने | प्रतिनियुक्तीने | |
| १. | सचिव | १ | - | १ | - |
| २. | कार्यकारी संचालक | १ | - | - | १ |
| ३. | संचालक (विद्युत अभियांत्रिकी) | २ | १ | - | १ |
| ४. | संचालक (वीज दर) | २ | १ | - | १ |
| ५. | संचालक (विधी) | १ | - | - | १ |
| ६. | संचालक (प्रशासन व वित्त) | १ | - | - | १ |
| ७. | उप-संचालक (तांत्रिक) | ८ | ७ | - | १ |
| ८. | उप-संचालक (विधी) | ४ | २ | - | २ |
| ९. | उप-संचालक (प्रशासन व वित्त) | ४ | २ | - | २ |
| १०. | अवर सचिव | १ | - | - | १ |
| ११. | कक्ष अधिकारी | २ | २ | - | - |
| १२. | सहाय्यक संचालक | ४ | २ | - | २ |
| १३. | संगणक प्रणाली प्रशासक | १ | - | - | १ |
| १४. | डेटाबेस/वेब प्रशासक | १ | १ | - | - |
| १५. | सहाय्यक लेखा अधिकारी | १ | - | १ | - |
| १६. | स्वीय सहाय्यक (निवड श्रेणी) | ३ | ३ | - | - |
| १७. | स्वीय सहाय्यक (उच्च श्रेणी) | २ | १ | - | १ |
| १८. | उच्च श्रेणी लघुटंकलेखक (इंग्रजी) | १ | - | - | १ |
| १९. | उच्च श्रेणी लघुटंकलेखक (मराठी) | १ | - | - | १ |
| २०. | स्वागतकार-नि-दूरध्वनी चालक-नि-कार्यालय सहाय्यक | १ | १ | - | - |
| २१. | लिपिक-टंकलेखक-नि-कार्यालय सहाय्यक | ७ | ४ | - | ३ |
| २२. | ग्रंथपाल-नि-कार्यालयीन सहाय्यक | १ | १ | - | - |
| २३. | वाहन चालक-नि-सामान्य सहाय्यक | ५ | ४ | - | १ |
| २४. | शिपाई | ८ | ७ | - | १ |
| | एकूण | ६३ | ३९ | ०२ | २२ |

## २.२ सल्लागार

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ९१(४) अंतर्गत, आयोग आपली कर्तव्ये पार पाडण्याकरिता त्यास मदत करण्यासाठी कुशल सल्लागारांची नियुक्ती, विहित करण्यात येतील त्या अटी व शर्तींवर, करु शकतो. आयोगाने मविनिआ (सल्लागारांच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती) विनियम, २००४ अधिसूचित केले आहेत. आयोग, आवश्यक असेल तेव्हा, विविध तांत्रिक, वित्तीय, कायदेविषयक व प्रशासकीय स्वरुपाची कार्ये पार पाडताना त्यास मदत करण्यासाठी सल्लागारांची नेमणूक करतो.

## २.३ अध्यक्ष व सदस्य

आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये, श्रीमती चंद्रा अय्यंगार यांनी अध्यक्षपदाचा कार्यभार ९ नोव्हेंबर, २०१५ रोजी सोडला. श्री. अज़ीज एम. खान आणि श्री. दीपक लाड हे सदस्य म्हणून या वर्षात पुढेही कार्यरत होते.

## ३. राज्य सल्लागार समिती

आयोगाकडून विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८७ अंतर्गत राज्य सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली आहे. राज्य सल्लागार समिती स्थापण्यामागचे उद्देश (एक) महत्त्वाच्या धोरणात्मक प्रश्नांबाबत; (दोन) परवानाधारकांनी पुरविलेल्या सेवेचा दर्जा, सातत्य आणि व्याप्तीशी संबंधित बाबींबाबत; (तीन) परवानाधारकांनी त्यांच्या परवान्याच्या अटी व आवश्यकतांचे पालन करण्याबाबत; (चार) ग्राहक हिताचे रक्षण करण्याबाबत आणि (पाच) विद्युत कंपन्यांचा ऊर्जा पुरवठा आणि त्यांच्या एकूण कामगिरीच्या दर्जाबाबत, आयोगास सल्ला देणे, हे आहेत. राज्य सल्लागार समिती (एस ए सी) दर दोन वर्षांनी पुनर्गठित करण्यात येते. आयोगाचे अध्यक्ष हे राज्य सल्लागार समितीचे अध्यक्ष असतात व आयोगाचे सदस्य हे या समितीचे पदसिध्द सदस्य असतात. आयोगाचे सचिव हे राज्य सल्लागार समितीचे सदस्य-सचिव आहेत.

आयोगाने, समितीच्या सदस्यांचा कार्यकाल २१ ऑगस्ट, २०१४ रोजी संपल्यानंतर, राज्य सल्लागार समितीचे पुनर्गठन दोन वर्षांच्या कालावधीसाठी खालील सदस्यांसह केले:-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अध्यक्ष, मविनिआ | – | पदसिध्द अध्यक्ष |
| २. | सदस्य, मविनिआ (एक) | – | पदसिध्द सदस्य |
| ३. | सदस्य, मविनिआ (दोन) | – | पदसिध्द सदस्य |
| ४. | सचिव, मविनिआ | – | सदस्य-सचिव |
| ५. | सचिव, अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन | – | पदसिध्द सदस्य |
| ६. | सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन | – | पदसिध्द सदस्य |
| ७. | सह सचिव, नूतन व नूतनशील ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली | – | सदस्य |
| ८. | महाव्यवस्थापक/ मुख्य अभियंता (विद्युत), मध्य रेल्वे, मुंबई | – | सदस्य |
| ९. | परिमंडल व्यवस्थापक (पश्चिम परिमंडल), ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ मर्यादित, मुंबई | – | सदस्य |
| १०. | महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर, मुंबई | – | सदस्य |
| ११. | फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री, (एफआयसीसीआय) महाराष्ट्र स्टेट कॉन्सिल, मुंबई | – | सदस्य |
| १२. | कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय), महाराष्ट्र स्टेट कॉन्सिल, मुंबई | – | सदस्य |
| १३. | प्रयास (ऊर्जा ग्रुप), पुणे | – | सदस्य |
| १४. | अध्यक्ष, मुंबई ग्राहक पंचायत, मुंबई | – | सदस्य |
| १५. | अध्यक्ष, ठाणे-बेलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन, नवी मुंबई, | – | सदस्य |
| १६. | महाराष्ट्र वीज ग्राहक संघटना, इचलकरंजी, जिल्हा - कोल्हापूर | – | सदस्य |
| १७. | टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई | – | सदस्य |
| १८. | इंदिरा गांधी इन्स्टिट्युट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च, मुंबई | – | सदस्य |
| १९. | मुख्य कार्यकारी अधिकारी, इंडियन एनर्जी एक्सचेंज लि., मुंबई | – | सदस्य |
| २०. | संचालक, (विद्युत अभियांत्रिकी विभाग), आय आय टी, मुंबई | – | सदस्य |

# ४. महाराष्ट्राच्या विद्युत क्षेत्रातील परिस्थिती

## ४.१ वीज निर्मिती

राज्याची विजेची गरज, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, खाजगी वीज निर्मिती कंपन्या, केंद्रीय क्षेत्राकडून मिळणारा वाटा आणि नूतनशील ऊर्जा निर्मात्यांकडून, भागविण्यात येते. महाराष्ट्राची ऊर्जेची गरज आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता १४४८९९ दशलक्ष युनिट्स इतकी होती व त्यापैकी ३३ टक्के महानिर्मिती कंपनी, २३ टक्के केंद्रीय क्षेत्राच्या वाट्यातून, २८ टक्के स्वतंत्र वीज निर्माते, ४ टक्के नूतनशील ऊर्जा निर्माते, ८ टक्के मुंबईतील निर्मात्यांकडून (टाटा पॉवर कंपनी-निर्मिती आणि आरइन्फ्रा-निर्मिती एकत्रितपणे), ४ टक्के अल्प-कालिन/आंतरराज्य द्वि-पक्षीय खरेदीतून, भागविण्यात आली. राज्याच्या एकूण स्थापित क्षमतेमध्ये, महानिर्मिती कंपनीचा १३३५७ मेगावॅट्सचा प्रमुख वाटा आहे. यामध्ये औष्णिक निर्मिती क्षमता ९९२० मेगावॅट्स, जल-विद्युत निर्मिती क्षमता २५८५ मेगावॅट्स, वायुवर आधारित निर्मिती क्षमता ६७२ मेगावॅट्स आणि १८० मेगावॅट्स सौर निर्मिती क्षमतेचा समावेश आहे. महानिर्मिती कंपनीची निर्मिती केंद्रे राज्यभर पसरली असून त्यामध्ये चंद्रपूर, कोराडी, पारस, परळी, भुसावळ, खापरखेडा, आणि नाशिक या औष्णिक केंद्रांचा, उरण येथील वायुवर आधारित प्रकल्पाचा आणि कोयना, वैतरणा, भिरा, घाटघर (पंप स्टोअरेज) या जल-विद्युत प्रकल्पांचा समावेश आहे. महानिर्मिती कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (महावितरण), या राज्य सरकारच्या वितरण कंपनीशी, दीर्घ-कालिन वीज खरेदी करार केला आहे.

महानिर्मिती कंपनीशिवाय, काही स्वतंत्र वीज निर्मात्यांनी (आयपीपी) महाराष्ट्रातील वितरण परवानाधारकांबरोबर विजेच्या पुरवठ्यासाठी करार केले आहेत. महाराष्ट्रातील काही प्रमुख स्वतंत्र वीज निर्माते खालीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र. | स्वतंत्र वीज निर्माते ( आय पी पी ) | स्थापित क्षमता ( मेगावॅट ) |
|---|---|---|
| १ | अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड, तिरोडा | ३३०० |
| २ | जेसड्ब्ल्यु एनर्जी लि., रत्नागिरी | १२०० |
| ३ | रत्तनइंडिया पॉवर लि., नाशिक | २७० |
| ४ | रत्तनइंडिया पॉवर लि., अमरावती | १३५० |
| ५ | वर्धा पॉवर कंपनी प्रा. लि., चंद्रपूर | ५४० |
| ६ | अभिजित एमएडीसी नागपूर एनर्जी प्रा. लि., नागपूर | २४६ |
| ७ | गुप्ता एनर्जी प्रा. लि. चंद्रपूर | १२० |
| ८ | आयडिअल एनर्जी प्रोजेक्ट्स लि. नागपूर | २७० |
| ९ | धारिवाल इन्फ्रास्ट्रक्चर लि. | ३०० |
| १० | विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लि. बुटीबोरी | ६०० |
| ११ | अन्य स्व-वापरासाठीचे वीज निर्माते / स्वतंत्र वीज निर्माते | ६५९.४ |
| | एकूण | ८८५५.४ |

### मुंबईतील स्थापित निर्मिती क्षमता

| अ.क्र. | कंपनी | स्थापित क्षमता ( मेगावॅटमध्ये ) |
|---|---|---|
| १ | दि टाटा पॉवर कं. लि. - निर्मिती (औष्णिक आणि जल) | १८७७ |
| २ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. - निर्मिती/ (डहाणू टीपीएस ) | ५०० |
| | एकूण | २३७७ |

राष्ट्रीय औष्णिक विद्युत महामंडळाच्या (एनटीपीसी) कोर्बा, विंध्याचल, कावास, गंधार, सिपत, मौदा, इ. आणि भारताचे अणुशक्ती विद्युत महामंडळ लि. (एनपीसीआयएल) च्या तारापूर येथील प्रकल्पामधून केंद्रीय क्षेत्रातील विजेचा वाटा पुरविण्यात आला होता. आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये एकूण ३२८९७.४ दशलक्ष युनिट्स केंद्रीय क्षेत्रातील वाट्यामधून पुरविण्यात आले.

## ४.२ विजेचे पारेषण

विजेचे पारेषण हे एक महत्त्वाचे कार्य असते ज्यामुळे विद्युत बाजारपेठेतील विजेचा पुरवठा आणि मागणी जोडले जातात. विविध पारेषण परवानाधारकांच्या पारेषण यंत्रणांना एकत्रितपणे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा असे म्हणतात. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचे नियोजन करण्याची जबाबदारी राज्य पारेषण कंपनी (एसटीयु), म्हणजेच महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीवर (महापारेषण) असते. महाराष्ट्रात खालीलप्रमाणे ९ पारेषण परवानाधारक आहेत -

| अ.क्र. | परवानाधारक | परवाना क्र. | परवान्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि.<br>महापारेषण कंपनी | मानीव परवानाधारक | |
| २ | टाटा पॉवर कंपनी (पारेषण)-(टीपीसी-टी) | सन २०१४ चा १ | १४ ऑगस्ट- २०१४<br>(१६ ऑगस्ट, २०१४ पासून अंमलात) |
| ३ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर (पारेषण)-(आरइन्फ्रा-टी) | सन २०११ चा १ | ११ ऑगस्ट, २०११<br>(१६ ऑगस्ट, २०११ पासून अंमलात) |
| ४ | जयगड पॉवर ट्रान्समिशन लि. (जेपीटीएल) | सन २००९ चा १ | ८ फेब्रुवारी, २००९ |
| ५ | अदानी ट्रान्समिशन (इंडिया) लि. (एटीआयएल)<br>(पूर्वीची अदानी पॉवर महाराष्ट्र लि.-एपीएमएल) | सन २००९ चा २ | ६ जुलै, २००९ |
| ६ | महाराष्ट्र ईस्टर्न ग्रिड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि.<br>(एमइजीपीटीसीएल) | सन २०१० चा १ | २१ सप्टेंबर, २०१० |
| ७ | सिन्नर पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि. (एसपीटीसीएल) | सन २०१० चा २ | २८ डिसेंबर, २०१० |
| ८ | अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि. (एपीटीसीएल) | सन २०१० चा ३ | ३० डिसेंबर, २०१० |
| ९ | विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लि. (व्हीआयपीएल-टी) | सन २०१५ चा १ | ५ जानेवारी, २०१५ |

विद्यमान आणि नव्याने उभारलेल्या निर्मिती प्रकल्पांमधील विजेचे निष्कासन करण्याकरिता, केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सीईए) आणि पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. (पीजीसीआयएल) यांच्याबरोबर समन्वयाने हाती घेण्यात आलेल्या यंत्रणा अभ्यासाच्या आधारे, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचे नियोजन, जिचा वर उल्लेखलेले पारेषण परवानाधारक एक भाग आहेत, राज्य पारेषण कंपनीकडून करण्यात येते.

महाराष्ट्रातील पारेषण वाहिन्या आणि बेज यांचा (३१ मार्च, २०१६ अखेरचा) तपशील खालीलप्रमाणे:-

| अ. क्र. | परवानाधारकाचे नाव | सर्किट-किमी वाहिनी | उप-केंद्रांची संख्या | ट्रान्सफॉर्मेशन क्षमता (एमव्हीए) |
|---|---|---|---|---|
| १ | महापारेषण कंपनी | ३९९९१.७४ | ६१४ | १०६१६७ |
| २ | टीपीसी-पारेषण | ११७५ | २१ | ९१८२ |
| ३ | आरइन्फ्रा-पारेषण | ५३९ | ८ | २९७५ |
| ४ | जेपीटीएल | ३३० | ० | ० |
| ५ | एटीआयएल | ४३८ | ० | ० |
| ६ | एपीटीसीएल | १०४ | २ | ० |
| ७ | एमइजीपीटीसीएल | ९९७ | २ | ३००० |
| ८ | एसपीटीसीएल | ५७ | ० | ० |
| ९ | व्हीआयपीएल-पारेषण | ६.१२ | ० | ० |
| | एकूण | ४३६३७.८६ | ६४७ | १२१३२४ |

## ४.३ विजेचे वितरण

महाराष्ट्रातील ग्राहकांची विजेची गरज चार वितरण परवानाधारक भागवितात. हे परवानाधारक पुढीलप्रमाणे आहेत - महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण कंपनी), रिलायन्स-इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी लि. (आरइन्फ्रा-वितरण), टाटा पॉवर कंपनी (टीपीसी-वितरण) आणि बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट). बेस्ट, आरइन्फ्रा-वितरण आणि टीपीसी-वितरण या कंपन्या बहुतांश मुंबई शहर आणि त्याच्या उपनगरांना वीज पुरवितात तर उर्वरित महाराष्ट्रात (आणि मुंबई उपनगरातील छोट्याशा क्षेत्राला) वीज पुरवठा महावितरण कंपनीद्वारे करण्यात येतो.

राज्यातील विजेच्या वितरणाची स्थिती खालील तक्त्यात दाखविण्यात आली आहे:-

| तपशील | महावितरण २०१५-१६ | टीपीसी २०१५-१६ | आरइन्फ्रा २०१५-१६ | बेस्ट २०१५-१६ |
|---|---|---|---|---|
| ग्राहकांची संख्या (लाखांत) | २३३.९ | ७.१९ | २३.२४ | १०.२२ |
| विक्री (दशलक्ष युनिट) | ९४,९६५ | ५,७६७ | ७,९८६ | ४,५७६ |
| वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च (रुपये प्रति युनिट) | ६.०३ | ८.५८ | ८.२३ | ९.५२ |
| वीज खरेदीचा सरासरी खर्च (रुपये प्रति युनिट) | ३.७९ | ४.५५ | ४.८८ | ५.१५ |
| एकाच वेळी असलेली (कोइन्सिडंन्ट) सर्वोच्च मागणी (मेवॅ) | १५,६५७ | ८८७ | १,३५९ | ८३७ |

याशिवाय, अधिसूचित करण्यात आलेल्या सेझ क्षेत्रास विजेचा पुरवठा करण्यासाठी ५ सेझ विकासकांकरिता आयोगाने वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी निर्गमित केल्या आहेत. या मानीव वितरण विकासकांनी त्यांचा वितरण व्यवसाय सुरु करण्याचे काम विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर आहे.

## ४.४ नूतनशील ऊर्जा

महाराष्ट्राची नूतनशील ऊर्जा निर्मितीची संभाव्य क्षमता १३७५० मेगावॅट आहे जी राष्ट्रीय क्षमतेच्या (८९२०० मेगावॅट) १५.४१ टक्के आहे. खालील तक्त्यात नूतनशील आणि अ-पारंपरिक स्त्रोतांपासून (पवन, सौर, बायोमास, ऊसाच्या चिपाडांपासून सह-निर्मिती इ. सह) ऊर्जा निर्मितीची सद्यस्थिती दाखविण्यात आली आहे:-

| स्त्रोत | भारत | | महाराष्ट्र | |
|---|---|---|---|---|
| | संभाव्य क्षमता (मेगावॅट) | संचयी साध्य (मेगावॅट) (३१.०३.२०१६पर्यंत) | संभाव्य क्षमता (मेगावॅट) | संचयी साध्य (मेगावॅट) (३१.०३.२०१६ पर्यंत) |
| पवन ऊर्जा | ४८५०० | २६,८६६.६६ | ९४०० | ४६६१.९१ |
| सौर ऊर्जा | ४-७ युनिट / चौ.मी. प्रति दिवशी | ६७६२.८५ | ४-७ युनिट्स / चौ.मी. प्रति दिवशी | ३६५.७५ |
| बायोमास | १८००० | - | ७८१ | २१५ |
| ऊसाच्या चिपाडांपासून सह-निर्मिती | ५००० | ४,८३१.३३ | २२०० | १७७५.८५ |
| लघु-जल विद्युत | १५००० | ४२७३.४७ | ७३३ | २९२.२५ |
| कचऱ्यापासून ऊर्जा | २७०० | ११५.०८ | ६३७ | ३७.७३१ |
| **एकूण ( मेगावॅट मध्ये )** | **८९२००** | **४२८४९.३८** | **१३७५०** | **७३४८.७५** |

देशाच्या एकूण निर्मितीशी तुलना करता, महाराष्ट्राची नूतनशील स्त्रोतांपासून ऊर्जा निर्माण करण्याची संभाव्य क्षमता जरी १५ टक्के असली तरी प्रत्यक्ष निर्मिती देशातील एकूण निर्मितीच्या १७ टक्के आहे. मागील १२ वर्षांमध्ये विविध स्त्रोतांपासून ऊर्जा निर्मिती क्षमतेमध्ये घालण्यात आलेली भर खालील तक्त्यामध्ये दाखविण्यात आली आहे:-

| अ. क्र. | नूतनशील ऊर्जेचा प्रकार | २००४ -०५ | २००५ -०६ | २००६ -०७ | २००७ -०८ | २००८ -०९ | २००९ -१० | २०१० -११ | २०११ -१२ | २०१२ -१३ | २०१३ -१४ | २०१४ -१५ | २०१५ -१६ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पवन ऊर्जा प्रकल्प | *४५६ | ५४५ | ४८५ | २६८ | १७८ | १३९ | २३९ | ४०७.०६ | २८८.६ | १०७४ | ३६२.०५ | २२०.२ | ४६६१.९१ |
| २ | बायोमास विद्युत प्रकल्प | ८ | ० | १० | १६ | ६१(#) | २० | ४० | ० | १५ | २० | १० | १५ | २१५ |
| ३ | ऊसाच्या चिपाडांपासून सह-निर्मिती | **८४ | १७ | ५७ | ८१ | ३० | २९ | ३२३.१ | २७२.९ | १९५ | २६५.७५ | ६० | ३६१.१ | १७७५.८५ |
| ४ | कचऱ्यापासून ऊर्जा | ० | ० | ० | ० | ० | ० | ४.७३ | ० | ४ | ३ | ० | २५.९८ | ३७.७१३ |
| ५ | लघु-जल प्रकल्प | *** २०६.८३ | ० | ० | ६.५ | ० | १६ | १६.९ | १८.५ | ६ | ० | १३.३ | ८.२२ | २९२.२५ |
| ६ | सौर ऊर्जा | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १९ | ३०.१५ | १८०.१० | ९९ | ३६.५ | ३६५.७५ |
| | **एकूण** | **७५४.८३** | **५६२** | **५५२** | **३७१.५** | **२६९** | **२०४** | **६२४.७३** | **७१७.४६** | **५३८.७५** | **१५४२.८५** | **५४४.३५** | **६६७.२८** | **७३४८.७५** |

*टीप :- सन २००४-०५ मध्ये क्षमतेमध्ये प्रत्यक्ष घातलेली भर फक्त ७४.२५ मेगावॅट्स होती. (स्त्रोत-महाऊर्जा)*

** या क्षमतेमध्ये सन २००४-०५ पूर्वी सुरु झालेले ४०७ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प समाविष्ट आहेत.*

*** या क्षमतेमध्ये सन २००४-०५ पूर्वी सुरु झालेले ६७ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प समाविष्ट आहेत.*

**** या क्षमतेमध्ये सन २००४ पूर्वी सुरु झालेले २०० मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प समाविष्ट आहेत.*

# ५. महत्वाचे प्रश्न

## ५.१ नूतनशील उर्जेच्या वाढीला चालना देणे

विद्युत अधिनियम २००३ आणि वातावरणातील बदला संबंधीच्या राष्ट्रीय कृती आराखड्याच्या अनेक उद्दिष्टांपैकी नूतनशील उर्जेच्या विकासाला चालना देणे, हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६ (१) (इ) अंतर्गत नूतनशील उर्जेच्या विकासाला चालना देण्यासाठी राज्य विद्युत नियामक आयोगाला संबंधित वितरण परवानाधारकाच्या क्षेत्रात नूतनशील ऊर्जा खरेदी करण्याची किमान टक्केवारी विनिर्दिष्ट करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार आयोगाने, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१० हे विनियम ७ जून, २०१० रोजी अधिसूचित केले आहेत. त्यामध्ये बंधन असलेल्या व्यक्ती/संस्थांकरिता आर्थिक वर्ष २०१०-११ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या कालावधीत नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून निर्माण झालेल्या ऊर्जेतून करावयाच्या किमान विजेच्या खरेदीचे परिमाण खालील तक्त्यात टक्केवारीत विहित करण्यात आले होते:-

| वर्ष | नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून ( युनिट मधील सममूल्य ऊर्जा ) करावयाच्या किमान वीज खरेदीचे परिमाण ( टक्केवारीत ) | | |
|---|---|---|---|
| | सौर | बिगर सौर ( अन्य नूतनशील ऊर्जा ) | एकूण |
| २०१०-११ | ०.२५ टक्के | ५.७५ टक्के | ६.० टक्के |
| २०११-१२ | ०.२५ टक्के | ६.७५ टक्के | ७.० टक्के |
| २०१२-१३ | ०.२५ टक्के | ७.७५ टक्के | ८.० टक्के |
| २०१३-१४ | ०.५० टक्के | ८.५० टक्के | ९.० टक्के |
| २०१४-१५ | ०.५० टक्के | ८.५० टक्के | ९.० टक्के |
| २०१५-१६ | ०.५० टक्के | ८.५० टक्के | ९.० टक्के |

वितरण परवानाधारकांनी त्यांच्यावरील नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनापैकी आर्थिक वर्ष २०१०-११ ते आर्थिक वर्ष २०१२-१३ या कालावधीत बिगर सौर (अन्य नूतनशील ऊर्जा) खरेदी ०.१ टक्का आणि आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या कालावधीत ०.२ टक्क्यांपर्यंत करण्याच्या बंधनाचे पालन, मिनी किंवा मायक्रो जल विद्युत प्रकल्पांमधून वीज खरेदी करुन, करावयाचे आहे.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाने (महाऊर्जा) नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाचा हिशोबपूर्ती अहवालाच्या आधारे, आयोगाने, वितरण परवानाधारकांनी आर्थिक वर्ष २०१३-१४ च्या नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या केलेल्या पूर्ततेच्या पडताळणीवर, आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये स्वत:हून आदेश देखील निर्गमित केले आहेत.

आयोग, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेचे दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० वर आधारित, निरनिराळ्या नूतनशील ऊर्जा 'स्त्रोतांसाठी लेव्हलाईज्ड वीज दर, प्रत्येक वर्षी निश्चित करते. आयोगाने आर्थिक वर्ष २०१४-१५ करिता नूतनशील विजेसाठी वीज दर ७ जुलै, २०१४ रोजी निर्गमित केला व त्याचा कालावधी दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ च्या आदेशाने पुढे ३१ डिसेंबर, २०१५ पर्यंत वाढविला. तथापि, आयोगाने १० नोव्हेंबर, २०१५ रोजी नवीन नूतनशील ऊर्जा वीज दर विनियम, २०१५

(आर्थिक वर्ष २०१९-२० पर्यंत अंमलात) अधिसूचित केले. त्यांनतर आयोगाने, सन २०१५ च्या प्रकरण क्र. १३५ मध्ये, १० नोव्हेंबर, २०१५ ते ३१ मार्च, २०१६ या कालावधीकरिता व्यापक (जेनेरिक) नूतनशील ऊर्जा वीज दराचा आदेश २५ जानेवारी, २०१६ रोजी निर्गमित केला.

## ५.२ वीज मागणी व्यवस्थापन

मविनिआ (वीज मागणी व्यवस्थापन कार्यान्वित करावयाची चौकट) विनियम, २०१० आणि मविनिआ (वीज मागणी व्यवस्थापनाच्या परिमापन आणि कार्यक्रमाच्या खर्चाच्या परिणामकारकतेचे निर्धारण) विनियम, २०१०, हे वीज मागणी व्यवस्थापनासंबंधी विनियम तयार करणारा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग हा देशातील पहिला विद्युत नियामक आयोग आहे.

या विनियमांचा उद्देश हा विद्युत कंपन्यांमार्फत कार्यक्षम ऊर्जा व ऊर्जा संवर्धनासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांना चालना देणे, हा आहे. या विनियमांमुळे परवानाधारकांवर वीज मागणी व्यवस्थापन हे त्यांच्या दैनंदिन कामकाजाचा एक भाग करणे आवश्यक झाले आहे. परवानाधारक वीज मागणी व्यवस्थापनावर होणारा त्यांचा खर्च हा शेवटी ग्राहकांकडून वसूल करावयाचा खर्च म्हणून तो एकूण महसुली गरजेत समाविष्ट करु शकतात.

वीज मागणी व्यवस्थापनास पध्दतशीरपणे प्रोत्साहन मिळावे आणि हे कार्यक्रम कमी खर्चिक असावेत यासाठी, आयोगाला मदत करण्याकरिता या विनियमांखाली वीज मागणी व्यवस्थापन सल्लागार समिती स्थापन करण्यात आली आहे.

मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ मधील विनियम ७.३ अंतर्गत वितरण परवानाधारकांनी कार्यक्षम ऊर्जा आणि वीज मागणी व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत ठरवून देण्यात आलेले लक्ष्यांक विचारात घेऊन किती वीज खरेदी करण्याची गरज असेल, त्याचा अंदाज काढणे आवश्यक आहे.

### आर्थिक वर्ष २०१५-१६ मधील वीज मागणी व्यवस्थापन कार्यक्रमाखालील प्रगती

आयोगाने वीज मागणी व्यवस्थापनांतर्गत प्रोत्साहनांवर आधारित विविध कार्यक्रम मंजूर केले आहेत. या कार्यक्रमांतर्गत झालेली प्रगती व सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे:

### टी-५ एफ टी एल कार्यक्रम

टी-५ फ्ल्युरोसंट ट्युबलाईटचा (एफटीएल) कार्यक्रम बेस्टने कार्यान्वित केला. बेस्टने आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये एकही टी-५ एफटीएल बसविला नाही. तथापि, बेस्टने एकत्रितपणे १८३५७ टी-५ एफटीएल बसविले आहेत आणि १.३६ दशलक्ष युनिट्सची बचत केली.

### पंचतारांकित सिलिंग पंख्यांचा कार्यक्रम

आरइन्फ्रा-वितरण, टीपीसी-वितरण, बेस्ट आणि महावितरणने पंचतारांकित सिलिंग पंख्यांचा कार्यक्रम राबविला.

आरइन्फ्रा वितरण कंपनीने या कार्यक्रमांतर्गत पहिला टप्पा राबविला असून त्यात त्यांनी ५९७ सिलिंग पंखे बदलून १.५७ दशलक्ष युनिट्सची बचत केली. आरइन्फ्राने २०००० सिलिंग पंखे बदलण्याचा लक्ष्यांक साध्य करुन ही योजना यशस्वीपणे राबवून बंद केली. टीपीसी- वितरणने ३,८५० पंखे बदलेले व १.३४७ दशलक्ष युनिट्सची बचत केली. बेस्टने आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये एकही पंचतारांकित सिलिंग पंखा बसविला नाही. तथापि, बेस्टने एकत्रितपणे ४७८६ तारांकित सिलिंग पंखे बसविले आणि ०.५४ दशलक्ष युनिट्सची बचत केली. महावितरण कंपनीने ४७६२ सिलिंग पंखे बदलून ही योजना बंद केली.

### पंचतारांकित स्प्लिट वातानुकुलित यंत्रांचा कार्यक्रम

आरइन्फ्रा वितरण आणि टीपीसी - वितरणने पंचतारांकित स्प्लिट वातानुकुलित यंत्रांचा कार्यक्रम राबविला होता. आरइन्फ्राने या

कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्याची अंमलबजावणी सुरु केली असून त्यांचा जुनी १५०० वातानुकुलित यंत्रे पंचतारांकित स्प्लिट वातानुकुलित यंत्रांनी बदलण्याचा लक्ष्यांक असून त्यापैकी त्यांनी १३८८ स्प्लिट वातानुकुलित यंत्रे बसविली आणि ०.४५ दशलक्ष युनिट्सची बचत केली. टीपीसी-वितरणने ९३९ विन्डो वातानुकुलित यंत्रे बदलून त्याऐवजी पंचतारांकित स्प्लिट वातानुकुलित यंत्रे बसविली आणि ०.९३९ दशलक्ष युनिट्सची बचत केली.

### औष्णिक ऊर्जा साठवणुकीचा ( टी इ एस ) कार्यक्रम

आयोगाने १८ मार्च, २०१० रोजी टीपीसी-वितरण करिता २५०० टीआर पर्यंतच्या लक्ष्यांकासह औष्णिक ऊर्जा साठवणुकीसाठी (टीइएस) एक पथदर्शक कार्यक्रम मंजूर केला. वरील कार्यक्रमाची रचना अशी करण्यात आली आहे की, औष्णिक ऊर्जा साठवणुकीच्या यंत्रणेचा वापर करुन दिवसाच्या वेळेतील सर्वोच्च मागणीचा भार रात्रीच्या वेळी सर्वोच्च मागणी नसतानाच्या काळात वर्ग करता येतो. औष्णिक ऊर्जा साठवणुकीच्या यंत्रणेच्या ग्राहकांना रु. १.०० प्रति युनिट याप्रमाणे १ वर्ष नियत रिबेट देण्यात येते. यासाठी रु. २१८ लाखांचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले होते. टीपीसी-वितरणने हा कार्यक्रम राबविला आणि त्यांनी आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये २.१० दशलक्ष युनिट्स सर्वोच्च मागणीच्या काळातून सर्वोच्च मागणी नसतानाच्या काळात वर्ग केले व या कार्यक्रमात सहभागी झालेल्या ग्राहकांना एकूण रु.४०.४६ लाख रिबेट दिले.

### पंचतारांकित रेफ्रिजरेटरचा कार्यक्रम

पंचतारांकित रेफ्रिजरेटरचा कार्यक्रम आरइन्फ्रा-वितरण आणि टीपीसी-वितरणकरिता मंजूर करण्यात आला होता. आरइन्फ्राने १३५ पंचतारांकित रेफ्रिजरेटर्स बदलले आणि २.६ दशलक्ष विजेच्या युनिट्सची बचत केली. आरइन्फ्राने ६५०० जुने अकार्यक्षम रेफ्रिजरेटर्स बदलण्याचा लक्ष्यांक साध्य करुन ही योजना बंद केली. टीपीसी-वितरणने २०९६ रेफ्रिजरेटर्स बसविले आणि ०.६५२ दशलक्ष युनिट्सची बचत केली.

### ऊर्जा लेखापरीक्षण कार्यक्रम

आरइन्फ्रा-वितरणने जास्त वीज वापर करणाऱ्या ग्राहकांकरिता ऊर्जा लेखापरीक्षण कार्यक्रम सुरु केला. कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या ग्राहकांना, जर त्यांना सूचित करण्यात येणाऱ्या उपाययोजना त्यांनी स्वीकारल्या तर प्रोत्साहन म्हणून त्यांना, लेखापरीक्षण शुल्काच्या ७५ टक्के रकमेची प्रतिपूर्ती करण्यात येते. त्यांनी ३० ग्राहकांचे ऊर्जा लेखापरीक्षण पार पाडले असून त्यामुळे सुमारे ६.३२ दशलक्ष युनिटसची बचत होईल. टीपीसी-वितरणकडून ७ ऊर्जा लेखापरीक्षणे पूर्ण करण्यात आली असून त्यांच्याकडून अंदाजे ३.४४ दशलक्ष युनिट्सची बचत होईल.

### प्रमाण देकार कार्यक्रम

विजेचा वापर कमी हावा म्हणून अनेक औद्योगिक आणि वाणिज्यिक ग्राहक ऊर्जा कार्यक्षम प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करतात. ग्राहकांनी स्वत:हून घेतलेल्या पुढाकारांना पाठिंबा देण्यासाठी टीपीसी-वितरणने वीज मागणी व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत 'प्रमाण देकार' नावाची एक योजना सुरु केली.

या 'प्रमाण देकार' योजनेंतर्गत (रविवार आणि अन्य सुट्टयांचे दिवस वगळून) सकाळी ८.०० ते रात्री ८.०० या कालावधीत सिध्द केलेल्या ऊर्जा बचतीच्या प्रत्येक युनिटकरिता रु. १ प्रमाणे प्रोत्साहन-अधिदान देण्यात येते. आयोगाने या कार्यक्रमांतर्गत एक पथदर्शक प्रकल्प जानेवारी २०१३ मध्ये मंजूर करुन या योजनेकरिता रु. ४२.५० लाखाच्या अंदाजपत्रकास मंजुरी दिली. अर्थिक वर्ष २०१४-१५ मध्ये ५ ग्राहकांनी या योजनेत स्वारस्य दाखविले. या योजनेत ३१ मार्च, २०१६ रोजी एकूण ०.७८८ दशलक्ष युनिट्सची बचत करण्यात आली.

### घरगुती ऊर्जा कार्यक्षम प्रकाश कार्यक्रम ( डीईएलपी )

टीपीसी-वितरण, आरइन्फ्रा-वितरण आणि बेस्ट यांच्याकडून घरगुती ऊर्जा कार्यक्षम प्रकाश हा कार्यक्रम राबविण्यात येतो. टीपीसी-वितरणने २,०९,०९७ एलईडी बल्बचे मार्च, २०१६ पर्यंत वाटप केले असून त्याद्वारे ०.९६४ दशलक्ष युनिट्सची बचत झाली. बेस्टने ही योजना डिसेंबर, २०१५ मध्ये सुरु केली असून ५०,०४६ एलईडी बल्बचे वाटप केले व त्याद्वारे ०.१४ दशलक्ष युनिट्सची बचत झाली. आरइन्फ्रा-वितरणने २,४३,००० एलईडी बल्बचे वाटप करुन ०.७ दशलक्ष युनिट्ची बचत केली. महावितरण कंपनीने ११.१९ कोटी एलईडीचे ३१ मार्च, २०१६ पर्यंत वाटप केले.

## ५.३ पारेषण नियोजन

भारतातील पारेषण यंत्रणेत आंतर-राज्य आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणांचा समावेश असतो. आंतर-राज्य आणि आंतर-प्रादेशिक पारेषण यंत्रणा या मुख्यत्वेकरुन पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (पीजीसीआयएल) च्या मालकीच्या आहेत. आंतर-राज्य पारेषण यंत्रणा, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा आणि समर्पित पारेषण वाहिन्या यांची आंतरजोडणी झालेली असते आणि या सर्व एकत्र मिळून पारेषण ग्रिड तयार होते.

केंद्रीय विद्युत प्राधिकरण हे विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ७३ (ए) मधील तरतुदींनुसार भावी वीज निर्मिती आणि पारेषण आराखडे तयार करण्यासाठी आणि नियोजन एजन्सींच्या कामकाजात सुसुत्रता आणण्यासाठी जबाबदार आहे. केंद्रीय पारेषण कंपनी (सीटीयु) ही एक कार्यक्षम आणि समन्वित आंतर-राज्य पारेषण यंत्रणा विकसित करण्यासाठी जबाबदार असते तर त्याचप्रमाणे, राज्य पारेषण कंपनी (एसटीयु) ही एक कार्यक्षम आणि समन्वित राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा विकसित करण्यासाठी जबाबदार असते.

राज्य पारेषण कंपनी (एसटीयु) ही, केंद्रीय पारेषण कंपनी (सीटीयु) आणि केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सीइए), प्रादेशिक विद्युत समिती (आरपीसी), विद्युत प्रकल्प विकासक यांच्याशी विचार-विनिमय करुन, पारेषण नियोजनाच्या निकषांच्या नियमावलीनुसार, आवश्यक यंत्रणा अभ्यास पार पाडून, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या जाळ्याच्या मजबुतीकरणासाठी, राज्यांतर्गत निर्मिती प्रकल्पामधील विजेच्या निष्कासनासाठी आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या ठिकाणांतून वीज खेचण्यासाठी, प्रस्ताव तयार करते. या अभ्यासात ग्रिडची मानके, ग्रिडला जोडणीची तांत्रिक मानके आणि अन्य संबंधित मानके/विनियम विचारात घेण्यात येतात. प्रमुख राज्यांतर्गत योजनांचे नियोजन समन्वित रितीने करण्यात येते आणि त्यावर स्थायी समितीमध्ये चर्चा करण्यात येते.

अति गर्दीच्या नागरी/निम-नागरी क्षेत्रात, अवघड भूप्रदेश इ. बाबतीत, वहिवाटीचे हक्क व खर्च इष्टतम स्तरावर ठेवून, पारेषण वाहिन्यांसाठी जागेचे नियोजन करण्यात येते. हे करण्यासाठी, अंतिम यंत्रणेसाठी उच्च व्होल्टेजची पातळी स्वीकारुन आणि सुरुवातीच्या टप्प्यावर एक पातळी कमी स्तरावर काम करुन, किंवा भविष्यात अतिरिक्त सर्किटमध्ये वाहिनी टाकणे शक्य होण्यासाठी बहु-सर्किट मनोऱ्यांचा किंवा एचव्हीडीसी, जीआयएस इ. सारख्या तंत्रज्ञानांचा वापर करण्यात येतो.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ३९ नुसार, राज्य पारेषण कंपनी ही, राज्य पारेषण कंपनीच्या ग्रिडला जोडलेले/जोडावयाचे राज्यांतर्गत वीज निर्माते आणि वितरण परवानाधारक यांच्याशी समन्वय साधून, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या नियोजनासाठी, एक नोडल एजन्सी म्हणून कार्य करते. राज्य पारेषण कंपनी ही राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा नियोजनासाठी एकल बिंदू संपर्क असते आणि ती, राज्यांतर्गत सर्व विद्युत कंपन्यांच्या वतीने, राज्यातील निर्मिती केंद्रांमधील विजेचे निष्कासन करण्यासाठी, वितरण परवानाधारकांच्या आवश्यकता भागविण्यासाठी आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या आराखड्यास अनुसरुन, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमधून वीज खेचण्यासाठी, जबाबदार असते. राज्य पारेषण कंपनी, नागरी नियोजन एजन्सीज्, विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) विकासक, औद्योगिक विकासक इ. यांच्या बरोबर, त्यांच्या दीर्घ-कालिन गरजा भागविण्यासाठी पुरेशा पारेषण मार्गिकेकरिता आणि नवीन उप-केंद्रांकरिता जागेची तरतूद करण्यासाठी, समन्वय साधते.

या यंत्रणेचे नियोजन, सदर यंत्रणा नेहमीच्या परिस्थितीत तसेच संभाव्य आकस्मिक घटना घडल्यानंतर अनुज्ञेय मर्यादांमध्ये काम करु शकेल अशा रितीने करण्यात येते. तथापि या यंत्रणेत क्वचित प्रसंगी टोकाच्या आकस्मिक घटनांना सामोरे जावे लागण्याची शक्यता असते आणि अशा घटनांना थांबविण्याचे नियोजन या यंत्रणांमध्ये केलेले नसू शकते. ग्रिडची सुरक्षितता राखण्यासाठी टोकाच्या/क्वचित घडणाऱ्या परंतु संभाव्य आकस्मिक घटना वेळोवेळी निश्चित करण्याची गरज आहे आणि त्यांचा विपरित परिणाम शिथिल करण्यासाठी सुयोग्य पध्दत, जसे-भारनियमन, निर्मितीच्या शेड्युलिंगचे फेर-निर्धारण, आयलॅन्डिंग, यंत्रणा संरक्षक योजना इ. तयार करणे आवश्यक आहे.

नियोजित पारेषण क्षमतेला मर्यादा आहे आणि पूर्व नियोजन न केलेल्या दिशेने जर मोठ्या प्रमाणावर विजेचे पारेषण करावयाचे असेल तर नक्कीच अतिभार निर्माण होऊ शकतो.

नवीन उप-केंद्रांकरिता आणि निर्मिती केंद्रांकरिता, उचित संपर्क यंत्रणांचे नियोजन केंद्रीय पारेषण कंपनी (सीटीयु)/राज्य पारेषण कंपनी (एसटीयु) यांच्याकडून करण्यात येते आणि त्याची अंमलबजावणी त्यांच्याकडून आणि वीज निर्मात्यांकडून करण्यात येते ज्यामुळे अशा यंत्रणा, केंद्र सुरु करण्याच्या वेळेस तयार झालेल्या असू शकतील.

यंत्रणेचे नियोजन, खालीलपैकी एक किंवा अनेक विद्युत यंत्रणा अभ्यासांच्या आधारे, करण्यात येते. जसे की- १) वीज प्रवाहाचा अभ्यास, २) शॉर्ट सर्किटचा अभ्यास, ३) स्थिरतेचा अभ्यास, ४) इएमटीपी अभ्यास (स्विचिंग/ डायनॅमिक ओव्हर-व्होल्टेजेज्, इन्सुलेशन को-ऑर्डिनेशन इ.करिता ).

मागितलेल्या दीर्घ-कालिन मुक्त प्रवेशाच्या आवश्यकता विचारात घेऊन, विद्युत केंद्रापासून सुरु होऊन जवळच्या ग्रिड बिंदूपर्यंत जाणाऱ्या नवीन पारेषण वाहिन्यांचे, निर्मात्यांशी विचार-विनिमय करुन व निर्मिती केंद्रांची जादा भार क्षमता विचारात घेऊन, नियोजन करण्यात येते. यंत्रणेच्या बळकटीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या नवीन पारेषण वाहिन्या टाकण्याचे नियोजन, वाहिन्या आणि ट्रान्सफॉर्मर्सच्या औष्णिक लोडिंग मर्यादेत १० टक्क्यांचे मार्जिन ठेवून, करण्यात येते.

महापारेषण कंपनीने कार्यान्वित करण्यासाठी, विजेचे निष्कासन करणाऱ्या खालील योजनांचे, नियोजन करण्यात आले आहे :-

| राज्य पारेषण कंपनीने आर्थिक वर्ष २०१४-१५ ते २०१८-१९ करिता नियोजन केलेल्या निष्कासन योजना ( ज्या महापारेषण कंपनीकडून कार्यान्वित करण्यात येतील ) | | | |
|---|---|---|---|
| ४००/२२० केव्ही कोराडी-२ उप-केंद्र (३X६६० मेवॅ (२०१५-१६) | ४०० केव्ही मालेगांव (सौदाणे) (२०१८-१९) | ७६५ केव्ही औरंगाबाद ३ उप-केंद्र (२०१५-१६) | परळी औष्णिक विद्युत केंद्र-विस्तारामधून विजेचे निष्कासन करण्याकरिता (१X२५० मेवॅ आरइपी.) (२०१७-१८) |
| ४००/२२० केव्ही चंद्रपूर-२ उप-केंद्र स्विचिंग केंद्रासह (चंद्रपूर २X५०० मेवॅ) (२०१४-१५) | ४०० केव्ही नांदगांव पेठ (आयपीपी उप-केंद्र) (२०१६-१७) | उरण जी.टी. येथील विस्तार प्रकल्पामधून विजेचे निष्कासन करण्याकरिता १) ब्लॉक क्र. १,-७०० मेवॅ (२०१७-१८) २) ब्लॉक क्र. २, ३४० मेवॅ (२०१७-१८) | ४०० केव्ही भूसावळ नवीन उप-केंद्र (१X६६० मेवॅ (२०१८-१९) |
| ४०० केव्ही दोंडाईचे उप-केंद्र ५X६६० मेवॅ उप-केंद्र (२०१८-१९) | ४०० केव्ही नाशिक (एकलहरे) उप-केंद्र (२०१७-१८) | २२० केव्ही मलकापूर उप-केंद्र (२०१८-१९) | २२० केव्ही - कौडगांव उप-केंद्र (२०१७-१८) |

## ५.४ मंजूर केलेले परवाने

आयोगाला विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ अंतर्गत विजेचे पारेषण, वितरण आणि व्यापार करण्यासाठी परवाना मंजूर करण्याचे अधिकार आहेत. परवानाधारक त्यांच्या परवान्यात सुधारणा करण्यासाठी आयोगाकडे कलम १८ अंतर्गत अर्ज करु शकतात. आयोगाने आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये नवीन परवाना मंजूर केला नव्हता.

रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. (आरइन्फ्रा-पारेषण) आणि अदानी ट्रान्समिशन (इंडिया) लि. (एटीआयएल) यांच्या परवान्यांमध्ये, राज्य पारेषण कंपनीच्या सुधारित आराखड्यानुसार परवान्याच्या क्षेत्रातील फेरबदल समाविष्ट करण्यासाठी, त्यांच्याकडून आलेले अर्ज विचारात घेऊन, सुधारणा करण्यात आली. ठाणे जिल्ह्यातील ऐरोली नॉलेज पार्क येथील गिगाप्लेक्स इस्टेट प्रा.लि. (विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ बी अंतर्गत असलेल्या तरतुदीनुसार एक मानीव वितरण परवानाधारक) यांच्याकडून देखील त्यांच्या माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवांसाठी वितरण परवान्यात विशिष्ट अटी लागू करण्यासाठी एक अर्ज दाखल करण्यात आला. आयोगाने गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. करिता २३ डिसेंबर, २०१५ रोजी परवान्याच्या विनियमांच्या विशिष्ट अटी अधिसूचित केल्या.

# ६. वीज दराचे व अन्य निवडक आदेश

## आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्राप्त झालेली आणि निकालात काढलेली प्रकरणे

आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये आयोगास प्राप्त झालेल्या आणि निकालात काढलेल्या प्रकरणांची स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| १. सुरुवातीची शिल्लक प्रकरणे | १२३ |
| २. वर्षादरम्यान प्राप्त झालेली / आयोगाने स्वत:हून घेतलेली प्रकरणे | १७० |
| ३. वर्षादरम्यान मागे घेतलेली प्रकरणे वगळून निकालात काढण्यात आलेली प्रकरणे | १०६ |
| ४. वर्षाअखेरीस शिल्लक प्रकरणे | १५६ |

आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशांची यादी परिशिष्ट-१ मध्ये देण्यात आली आहे. या यादीवरुन आयोगाने हाताळलेले विविध प्रश्न दिसून येतील. आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये पारित झालेल्या आदेशांचे विषय-निहाय वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे:-

| | |
|---|---|
| वीज दराशी संबंधित (नूतनशील ऊर्जा वगळून) | ४५ |
| नूतनशील उर्जेशी संबंधित (मुक्त प्रवेश वगळून) | १३ |
| मुक्त प्रवेशांशी संबंधित प्रश्न | ९ |
| विद्युत लोकपाल/ ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या आदेशांची अ-पूर्तता | ९ |
| परवाना मंजुरीशी संबंधित | ५ |
| वीज खरेदीशी संबंधित | ४ |
| पारेषण कामांसाठी जमीन मालकांना नुकसानभरपाई देण्याबाबत | ३ |
| अन्य | १८ |

याशिवाय, आयोगाने आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये १८५ दैनिक आदेश निर्गमित केले. दैनिक आदेशामध्ये प्रत्येक प्रकरणाच्या सुनावणीचा सारांश आणि आयोगाकडून सुनावणीमध्ये देण्यात आलेल्या निर्देशांचा समावेश असतो.

## वीज दर निश्चितीकरण

आर्थिक वर्ष २०१५-१६ हे दुसऱ्या बहु-वर्षीय वीज दराच्या नियंत्रण कालावधीचे अंतिम वर्ष होते. आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये, आयोगाने निर्मिती कंपन्या, पारेषण कंपन्या आणि वितरण कंपन्यांनी आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी अंतिम अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी तात्पुरते अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी सुधारित एकूण महसुली गरज (एआरआर) आणि वीज दर निश्चित करण्यासाठी मध्यावधी आढाव्याकरिता दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर आदेश निर्गमित केले. यापूर्वी मुदतवाढ देण्यात आलेल्या महावितरण कंपनीच्या प्रकरणी, बहु-वर्षीय वीज दराचा आदेश पारित करण्यात आला.

## वीज निर्मिती

**महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि. ( महानिर्मिती ) ची मध्यावधी आढाव्याकरिता ( एमटीआर ) याचिका ( सन २०१५ चे प्रकरण क्र. १५ )**

महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि. (महानिर्मिती)च्या मध्यावधी आढावा याचिकेवर जनतेकडून अभिप्राय मागविण्यात आले आणि या प्रकरणी ७ एप्रिल, २०१५ रोजी जाहीर सुनावणी घेण्यात आली. आयोगाने दि. २६ जून, २०१५ रोजी खालील निर्देशांसह मध्यावधी आढाव्याचा आदेश पारित केला:

१) महानिर्मिती कंपनीने आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी मागितलेल्या रु. ६५२.४७ कोटींच्या निव्वळ महसुली तुटीच्या ऐवजी आयोगाने रु. १६९.४६ कोटींची महसुली शिल्लक निश्चित केली. ही महसुली शिल्लक, लागू असलेले येणे व्याज (कॅरिंग कॉस्ट) आणि आर्थिक वर्ष २०१४-१५ च्या तात्पुरत्या अचूक समायोजनामुळे आलेली महसुली शिल्लक या बाबी, भुसावळ संच क्र. ४ आणि संच क्र. ५ साठी भांडवली खर्च आणि वीज दराच्या मान्यतेसाठीच्या सन २०१४ च्या प्रकरण क्र. २०१ मध्ये दि. २० एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या आदेशामधील मंजूर महसुली तुटीच्या समायोजनासाठी विचारात घेण्यात आल्या.

२) आर्थिक वर्ष २०१३-१४ / २०१४-१५ करिता ज्या निर्मिती केंद्रांची प्रत्यक्ष/अंदाजित उपलब्धता, प्रमाणकानुसार उपलब्धतेपेक्षा कमी आहे, त्यांच्या वार्षिक स्थिर आकारांमध्ये (एएफसी), बहु-वर्षीय वीज दर विनियमांनुसार, यथा-प्रमाणात कपात करण्यात आली. त्याचप्रमाणे, ज्या निर्मिती केंद्रांची अंदाजित उपलब्धता, लक्ष्यांकित उपलब्धतेपेक्षा कमी आहे, त्यांच्या एएफसी मध्ये आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता कपात करण्यात आली आहे.

३) आर्थिक वर्ष २०१३-१४ आणि २०१४-१५ साठी विलंब भरणा अधिभार संबंधित वर्षासाठी वीज दरेतर उत्पन्न म्हणून विचारात घेण्यात आला. भुसावळ संच क्र. ४ आणि संच क्र. ५ साठी भांडवली खर्च आणि वीज दराच्या मान्यते संबंधातील सन २०१४ च्या प्रकरण क्र. २०१ मध्ये दि. २० एप्रिल, २०१५ रोजीच्या आदेशामध्ये मान्यता दिलेल्या महसुली तुटीच्या समायोजनासाठी, आर्थिक वर्ष २०१०-११ ते आर्थिक वर्ष २०१२-१३ साठीचा विलंब भरणा अधिभार विचारात घेण्यात आला.

४) महानिर्मिती कंपनीच्या केंद्रांच्या मागील ३ वर्षांतील प्रत्यक्ष कामगिरीच्या आधारे, आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी विजेच्या अंदाजित उपलब्धतेस मान्यता देण्यात आली.

५) दि. ३ मार्च, २०१४ रोजी मान्यता दिलेल्या पूर्वीच्या बहु-वर्षीय वीज दराच्या आदेशामध्ये प्रमाणकानुसार कामगिरीचे मापदंड आणि एप्रिल ते डिसेंबर, २०१४ या कालावधीत असलेल्या प्रत्यक्ष इंधनाच्या किमतीच्या आधारे, आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी ऊर्जा आकारांना मान्यता देण्यात आली.

**विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लि. (व्हीआयपीएल-निर्मिती) ची, निर्मिती केंद्राची वाणिज्यिक तत्वावर कामकाजास सुरुवात झाल्यानंतर, परकीय कर्जावरील एफइआरव्ही/हेजिंग खर्चाच्या उपाययोजनेसाठी याचिका (सन २०१४ च्या प्रकरण क्र. १५०)**

आरइन्फ्रा-वितरणला विजेचा पुरवठा करणाऱ्या व्हीआयपीएल-निर्मितीने, त्यांच्या निर्मिती केंद्राची वाणिज्यिक तत्त्वावर कामकाजास सुरुवात झाल्यानंतर, परकीय कर्जाच्या परतफेडीसंबंधात परकीय चलनाच्या दरातील तफावत (एफइआरव्ही) आणि जोखीम संरक्षित करण्याच्या उपाययोजनेतील (हेजिंग) अडथळे दूर करण्यासाठी याचिका दाखल केली.

आयोगाने दि. १५ ऑक्टोबर, २०१५ रोजी दिलेल्या आदेशात असा निर्णय दिला की, आयोगाच्या वीज दराच्या विनियमांमध्ये हेजिंग आणि एफइआरव्ही आणि त्या अनुषंगाने होणारे फायदे किंवा तोटे याबाबतच्या उपाययोजना स्पष्टपणे समाविष्ट करण्यात आल्या नसल्या तरी, व्हीआयपीएलने हेजिंगबाबत दूरदर्शी निर्णय घेण्याची गरज आहे आणि त्यांनी भविष्यात वीज दराच्या प्रस्तावांमध्ये कोणत्याही परिणामस्वरुप खर्चास मंजुरी मागताना, असा निर्णय ग्राहकांच्या सर्वोत्तम हिताचा असल्याबाबत आयोगाचे समाधान करणे आवश्यक आहे.

**टाटा पॉवर कंपनी लि.-निर्मिती व्यवसाय (टीपीसी-निर्मिती) ची मध्यावधी आढाव्याकरिता याचिका (सन २०१५ चे प्रकरण क्र. ६)**

टीपीसी-निर्मिती ने त्यांच्या २०२७ मेगावॅट निर्मिती क्षमतेकरिता दाखल केलेल्या मध्यावधी आढाव्याच्या याचिकेवर दि. ४ फेब्रुवारी, २०१५ रोजी तांत्रिक वैधता सत्र पार पाडले. या प्रकरणी जनतेचे अभिप्राय मागविण्यात आले आणि दि. २० मार्च, २०१५ रोजी जाहीर सुनावणी घेण्यात आली. आयोगाने दि. २६ जून, २०१५ रोजी खालील निर्देशांसह आदेश पारित केला :

१) आयोगाकडून काळजीपूर्वक छाननीनंतर, आर्थिक वर्ष २००८-०९ आणि आर्थिक वर्ष २००९-१० साठी सविस्तर प्रकल्प अहवाल नसलेल्या भांडवलीकरणास (नॉन-डीपीआर) मान्यता देण्यात आली. तथापि, विद्युत अपिल न्यायाधिकरणाने (एटीई) दिलेल्या निकालानुसार, आर्थिक वर्ष २०१०-११ नंतर अशा भांडवलीकरणाची मर्यादा सविस्तर प्रकल्प अहवाल असलेल्या भांडवलीकरणाच्या २० टक्क्यांपर्यंत ठेवण्यात आली. टीपीसी-निर्मिती ला संबंधित नॉन-डीपीआर योजना एकत्रित करण्याचे आणि आदेशापासून ३ महिन्यांच्या आत त्यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल कार्योत्तर मंजुरीसाठी सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

२) रोटरला आग लागल्याच्या दुर्घटनेमुळे विजेची कमी उपलब्धता झाल्यामुळे, आयोगाने युनिट ८ साठी आर्थिक वर्ष २०१३-१४ करिता वार्षिक स्थिर आकारांमध्ये रु. ९.६६ कोटींच्या कपातीस मान्यता दिली. ही घटना एक दैवी आपत्तीची घटना होती का हे ठरविण्यासाठी, ती नियंत्रणाबाहेरील होती किंवा कसे हे निश्चित करणे आवश्यक असल्यामुळे सदर घटनेसंबंधातील सर्व सविस्तर तपशील सादर करण्याचे निर्देश टीपीसी-निर्मितीला देण्यात आले. या निर्देशांची पूर्तता न झाल्यास, आयोग एएफसीमध्ये कपात करु शकेल.

३) टीपीसी-निर्मितीचे युनिट क्र. ६ हे जास्त खर्चामुळे नेहमीप्रमाणे चालविण्यात येत नाही. महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राच्या (एमएसएलडीसी) निर्देशांनुसार जेव्हा युनिट क्र. ६ चालू ठेवून विद्युत निर्मिती करणे आवश्यक ठरले तेव्हा त्याच्या इंधन खर्चास परवानगी देताना, आयोगाने प्रत्यक्ष इंधन मिश्रण, प्रत्यक्ष इंधनाच्या किमती आणि सुधारित प्रमाणकानुसार मापदंड विचारात घेतले, आणि आर्थिक वर्ष २०१४-१५ करिता तात्पुरत्या तत्वावर रु. ७३३.९३ कोटीच्या इंधन खर्चास मान्यता दिली.

४) आधीच्या वीज दराच्या आदेशासंबंधात, आर्थिक वर्ष २०१२-१३ आणि आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी तात्पुरते अचूक समायोजन यातून एटीई च्या निकालाच्या परिणामस्वरुप उद्‌भवणाऱ्या रु. ८५.८२ कोटींच्या संचयी नक्त महसुली तुटीस आयोगाने मान्यता दिली, जी बेस्ट, टीपीसी-वितरण आणि आरइन्फ्रा- वितरण या वितरण परवानाधारकांकडून जून, २०१५ ते मार्च, २०१६ या कालावधीत दहा हप्त्यांमध्ये वसूल करायची आहे.

५) मागील वसुलीच्या संबंधात, फक्त आधीच्या वीज दर आदेशामध्ये नाकारलेल्या आणि त्यानंतर एटीई ने परवानगी दिलेल्या खर्चावर येणे असलेल्या व्याजास (कॅरींग कॉस्ट) मान्यता देण्यात आली.

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.- निर्मिती व्यवसाय ( आरइन्फ्रा-निर्मिती ) ची मध्यावधी आढाव्याकरिता याचिका ( सन २०१४ चे प्रकरण क्र. २२२ )**

डहाणू येथील ५०० मेगावॅट क्षमतेच्या औष्णिक विद्युत केंद्रासाठीच्या आरइन्फ्रा-निर्मितीच्या मध्यावधी आढाव्याच्या याचिकेवर तांत्रिक वैधता सत्राचे आयोजन करण्यात आल्यावर या प्रकरणी जनतेकडून अभिप्राय मागविण्यात आले. दि. १८ फेब्रुवारी, २०१५ रोजी जाहीर सुनावणी घेण्यात आली. आयोगाने दि. २६ जून, २०१५ रोजी खालील निर्देशांसह आदेश पारित केला:

१) आयोगाने, एटीई च्या काही निकालामुळे, येणे असलेले व्याज (कॅरींग कॉस्ट) आणि आय-कर, मागील वर्षांचे भांडवलीकरण यांचे पुनर्निर्धारण आणि प्रमाणकानुसार कर्जाचा पुनर्वित्तपुरवठा यांच्या एकत्रित परिणामापोटी, आरइन्फ्रा-निर्मितीने मागितलेल्या रु. २६५.१५ कोटींच्या खर्चा ऐवजी, रु. १३५.७४ कोटींच्या खर्चास मंजुरी दिली.

२) आयोगाने आर्थिक वर्ष २०१२-१३ आणि आर्थिक वर्ष २०१३-१४ करिता अनुक्रमे रु. २६.३२ कोटींची महसुली तूट आणि रु. ७४.५० कोटीच्या महसुली शिलकीस मान्यता दिली. तसेच आर्थिक वर्ष २०१४-१५ करिता तात्पुरत्या अचूक समायोजनामध्ये रु. ५४.८२ कोटींच्या महसुली शिलकीस मान्यता दिली.

३) एटीई च्या निकालानुसार, आर्थिक वर्ष २००९-१० ते आर्थिक वर्ष २०११-१२ या कालावधीकरिता आय-करास मान्यता देताना, करपूर्व नफ्याच्या (पीबीटी) तत्वावर आय-कराची गणना करण्यासाठीची पध्दत एटीईने त्यानंतर ठरवून दिल्यामुळे येणे असलेले व्याज (कॅरींग कॉस्ट) विचारात घेण्यात आले नाही.

**अदानी पॉवर महाराष्ट्र लि. ( एपीएमएल ) ची दि. ८.९.२००८ च्या वीज खरेदी कराराच्या संबंधातील 'कायद्यातील बदला'मुळे वीज निर्मितीच्या दरात सुधारणा करण्यासाठी याचिका ( सन २०१४ चे प्रकरण क्र. १६३ )**

एपीएमएल ने, कायद्यातील विविध बदलांच्या घडामोडीमुळे प्रकल्पाचा खर्च आणि महसुलावर मोठा परिणाम झाल्याचे नमूद करुन, तिरोडा येथील त्यांच्या निर्मिती संचातून महावितरण कंपनीला विजेची विक्री करण्यासाठीच्या (स्पर्धात्मक बोलीनंतर करण्यात आलेल्या) वीज खरेदी कराराच्या कलम १३ चा (कायद्यातील बदल) उल्लेख करुन, वीज दरात समायोजन करण्यासाठी याचिका दाखल केली. आयोगाने दि. २० एप्रिल, २०१५ च्या आदेशान्वये खालील निर्देश दिले:

१) कोळशावरील स्वच्छ ऊर्जा उपकर आणि उत्पादन शुल्क, देशांतर्गत कोळशावरील स्वामित्वधनाच्या दरातील बदल, भरणावळ उत्पादन शुल्क आणि स्वामित्वधनाचा अंतर्भाव आणि किमान वैकल्पिक कर (एमएटी) मध्ये वाढ या बाबी, वीज खरेदी करारातील कलम १०.१.१ नुसार 'कायद्यातील बदला'च्या घटना आहेत.

२) कोळशावरील वन कराची आकारणी हा कर नसून छत्तीसगढ सरकारने पथकर/प्रवेश शुल्कासारखे लावलेले शुल्क आहे आणि ते 'कायद्यात बदल' होत नाही.

३) कोळशाचे मूल्य निर्धारण युएचव्ही ऐवजी जीसीव्हीच्या आधारे करावे किंवा नाही याबाबतचा बदल, कोल इंडिया लि.कडून कोळशाच्या आकारानुसार आकारामध्ये वाढ (कोल सायजिंग चार्जेस) आणि भूपृष्ठावरील वाहतूक आकारामधील वाढ हे, अशा वीज खरेदी करारातील (पीपीए) 'कायद्यातील बदला'मध्ये अंतर्भूत असलेले प्रश्न केंद्रीय विद्युत नियामक आयोगाच्या विचाराधीन असल्यामुळे, आयोग त्यावर सध्या निर्णय देणार नाही.

४) भारतीय रेल्वेने सुरु केलेला इंधन समायोजन आकार 'कायद्यातील बदला'मध्ये येत असल्याचा दावा आयोगाने फेटाळला.

५) कोळशाच्या वाहतुकीवरील विकास अधिभारात वाढ ही घटना वीज खरेदी करारांतर्गत 'कायद्यातील बदला'मध्ये येते.

६) कोळशाच्या वाहतुकीवर व्यस्त हंगाम अधिभार लादणे आणि त्यात आणखी वाढ करणे ही घटना वीज खरेदी करारांतर्गत 'कायद्यातील बदला'मध्ये येते.

७) रेल्वेने माल वाहतुकीच्या एकूण वहणावळीवर सेवा कर, शिक्षण उपकर आणि उच्च शिक्षण उपकर आकारणे हा, 'कायद्यातील बदल' आहे.

**सन २०१४ च्या प्रकरण क्र. ६३ मध्ये दि. ५.०५.२०१४ रोजी दिलेल्या आदेशामध्ये कॅप्टीव्ह लोहारा कोळसा खाणीतून आणि अन्य स्त्रोतांपासूनच्या कोळशापासून वीज निर्मितीसाठी विजेचे वेगवेगळे दर विचारात न घेतल्यामुळे होणाऱ्या त्रासाच्या संबंधात एपीएमएलची याचिका ( सन २०१५ चे प्रकरण क्र. २८ )**

एपीएमएलने या याचिकेत नमूद केले की, सन २०१४ च्या प्रकरण क्र. ६३ मध्ये दि. ५ मे, २०१४ रोजी दिलेल्या आदेशात आयोगाने ८०० मेगावॅट वीज निर्मितीसाठी आधीच्या कॅप्टीव्ह लोहारा कोळसा खाणीतून आणि उर्वरित ५२० मेगावॅट वीज निर्मितीसाठी अन्य स्त्रोतांपासूनच्या कोळशापासून वीज निर्मितीसाठी विजेचे वेगवेगळे दर विचारात न घेतल्यामुळे त्यांना त्रास सहन करावा लागत आहे.

आयोगाने दि. ९ नोव्हेंबर, २०१५ रोजी दिलेल्या आदेशात नमूद केले की, एपीएमएलकडून सन २०१४ च्या प्रकरण क्र. १३१ च्या पुनर्विलोकन याचिकेत यापूर्वी हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्यामुळे, आयोगाने असा निर्णय दिला की, एपीएमएलने आधीच्या प्रकरणामध्ये समान कारणास्तव समान दिलासा मागितल्यामुळे सदर याचिका दाखल करुन घेण्यायोग्य नाही.

**रत्तनइंडिया पॉवर लि. ( आरआयपीएल )ची हानिपूरक वीज दराच्या संबंधातील सन २०१३ च्या प्रकरण क्र. १५४ आणि सन २०१४ च्या प्रकरण क्र. १४७ मधील आदेशांच्या पुनर्विलोकनासाठी याचिका ( सन २०१४ चे प्रकरण क्र. १५८ )**

आरआयपीएल (पूर्वीची इंडियाबुल्स पॉवर लि.) ने, भारत सरकार आणि कोल इंडिया लि.च्या धोरणातील बदलामुळे लिंकेज कोळशाच्या पुरवठ्यात निर्माण झालेला तुटवडा आणि भारत सरकारने दिलेल्या सल्ल्यामुळे, त्यांनी केलेला अतिरिक्त खर्च भरुन काढण्यासाठी दाखल केलेल्या सन २०१३ च्या प्रकरण क्र. १५४ मध्ये महावितरण कंपनीशी झालेल्या त्यांच्या (स्पर्धात्मक बोलीनंतर करण्यात आलेल्या) वीज खरेदी करारातील वीज निर्मितीच्या दरात समायोजन करण्याची मागणी केली होती. आयोगाने १५ जुलै, २०१४ रोजी दिलेल्या आदेशामध्ये अन्य स्त्रोतांकडून कोळसा प्राप्त करण्यासाठी अतिरिक्त खर्चाचा प्रश्न सोडविण्यासाठी हानिपूरक वीज दरासाठी चौकट विनिर्दिष्ट केली होती. ती चौकट या घटना 'कायद्यातील बदल' म्हणून स्वीकारण्यापासून वेगळी होती.

आरआयपीएलने, प्राप्त झालेल्या कोळशाच्या गुणवत्तेमधील फरकाचा प्रश्न सोडविण्याची गरज आणि हानिपूरक वीज दराची रक्कम काढण्यासाठी सन २०१४ च्या प्रकरण क्र. १४७ मध्ये दि. २० ऑगस्ट, २०१४ रोजी दिलेल्या परिणामस्वरुप आदेशाच्या पुनर्विलोकनासह, विविध कारणांमुळे वरील आदेशाचे पुनर्विलोकन करण्यासाठी याचिका दाखल केली.

पुनर्विलोकन याचिकेवर आयोगाने दि. ३० ऑक्टोबर, २०१५ रोजी दिलेल्या आदेशामध्ये असे नमूद केले की, कोळशाचा दर्जा, या घटना 'कायद्यात बदल' होतो किंवा नाही इ. प्रश्न, मागील कार्यवाही दरम्यान उपस्थित करण्यात आले होते. आयोगाने योग्य विचारानंतर, कोळशाच्या दर्जा ऐवजी कोळशाच्या परिमाणा इतक्या हानिपूरक वीज दराचे प्रदान करण्यास परवानगी दिली होती आणि ही याचिका पुनर्विलोकनासाठीच्या आवश्यक बाबींची पूर्तता करीत नसल्याचे नमूद केले.

**एपीएमएलची हानिपूरक वीज दराच्या संबंधातील सन २०१३ च्या प्रकरण क्र. १८९ आणि सन २०१४ च्या प्रकरण क्र. १४० मधील आदेशांच्या पुनर्विलोकनासाठी याचिका ( सन २०१४ चे प्रकरण क्र. १५९ )**

भारत सरकार आणि कोल इंडिया लि.च्या धोरणातील बदलामुळे लिंकेज कोळशाच्या पुरवठ्यात निर्माण झालेला तुटवडा आणि भारत सरकारने दिलेल्या सल्ल्यामुळे, वीज खरेदी कराराच्या तरतुदीनुसार कायद्यातील बदला संबंधी एपीएमएलचा दावा काहीही असला तरी, एपीएमएलने देखील सन २०१३ च्या प्रकरण क्र. १८९ मध्ये, महावितरण कंपनीशी झालेल्या त्यांच्या वीज खरेदी करारांतर्गत विजेच्या पुरवठ्यासाठी अतिरिक्त कोळशाच्या खर्चाची परिगणना करण्यासाठी आणि हानिपूरक वीज दर निश्चित करण्यासाठी एक पध्दत ठरवून देण्याची मागणी केली होती. आयोगाने आपल्या आदेशात हानिपूरक वीज आकार वाढण्यासाठी, लिंकेज कोळशाच्या परिमाणात झालेल्या घसरणीवर उपाययोजना करण्यासाठी, एक पर्याय म्हणून, चौकट विनिर्दिष्ट केली होती.

एपीएमएल ने सन २०१३ च्या प्रकरण क्र. १८९ मधील आदेशाच्या आणि सन २०१४ च्या प्रकरण क्र. १४० मध्ये पारित करण्यात आलेल्या परिणामस्वरुप आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी विविध कारणांकरिता एक याचिका (सन २०१४ चे प्रकरण क्र. १५९) दाखल केली.

आयोगाने पुनर्विलोकन याचिकेवर दि. ३० ऑक्टोबर, २०१५ रोजी दिलेल्या आदेशामध्ये असे नमूद केले की, कोळशाचा दर्जा, या घटनांमुळे 'कायद्यात बदल' होतो किंवा नाही इ. प्रश्न, मागील कार्यवाही दरम्यान उपस्थित करण्यात आले होते. आयोगाने योग्य विचारानंतर, कोळशाच्या दर्जा ऐवजी कोळशाच्या परिमाणा इतके हानिपूरक वीज दराचे प्रदान करण्यास परवानगी दिली आणि ही याचिका पुनर्विलोकनासाठीच्या आवश्यक बाबींची पूर्तता करीत नसल्याचे नमूद केले.

तथापि, आयोगाने हानिपूरक वीज दर कोणत्या दिनांकापासून लागू करता येईल त्या फक्त दिनांकाच्या पुनर्विलोकनास परवानगी दिली आणि त्यानुसार त्यात सुधारणा केली.

## विजेचे पारेषण

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.-पारेषण व्यवसाय ( आरइन्फ्रा-पारेषण )ची मध्यावधी आढाव्यासाठी याचिका ( सन २०१४ चे प्रकरण क्र. २२१ )**

या प्रकरणी दि. २८ जानेवारी, २०१५ रोजी तांत्रिक वैधता सत्र आयोजित करण्यात आले. आयोगाने दि.१३ फेब्रुवारी, २०१५ रोजी सुधारित याचिका दाखल करुन घेतली आणि दि. १६ मार्च, २०१५ रोजी जाहिर सुनावणी घेतली.

आयोगाने २६ जून २०१५ रोजी खालील निर्देशांसह आदेश पारित केला :

१) आयोगाने, आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या एकूण महसुली गरजेमध्ये समायोजित करावयाच्या रु. ८.७२ कोटीच्या येणे असलेल्या व्याजासह (कॅरींग कॉस्ट), सन २०१२ च्या अपील क्र. १३९ मध्ये एटीई ने दिलेल्या निकालाच्या परिणामास मंजुरी दिली.

२) आयोगाने, आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी अचूक समायोजन करुन रु. ९५.८३ कोटींच्या संचयी महसुली तुटीस, जी पुढील वर्षाच्या वीज दरामध्ये समायोजित करावयाची होती, मंजुरी दिली.

३) आयोगाने, आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी अचूक समायोजन करुन, रु. ९४.०५ कोटींच्या महसुली शिलकीस मंजुरी दिली.

४) आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी रु. ५१.३३ कोटींच्या महसुली शिलकीस तात्पुरती मंजुरी देण्यात आली.

५) एटीई च्या निकालाच्या परिणामासह मागील वर्षांची महसुली शिल्लक विचारात घेऊन, आयोगाने, आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता वसुल करावयासाठी आरइन्फ्राने मागणी केलेल्या रु. २५६.५२ कोटींच्या नक्त एकूण महसुली गरजे ऐवजी रु. २०८.८६ कोटींच्या नक्त एकूण महसुली गरजेस मंजुरी दिली.

**टाटा पॉवर कंपनी लि.-पारेषण व्यवसाय ( टीपीसी-पारेषण )ची मध्यावधी आढाव्यासाठी याचिका ( सन २०१५ चे प्रकरण क्र. ५ )**

या प्रकरणी तांत्रिक वैधता सत्र आयोजित केल्यानंतर जनतेकडून अभिप्राय मागविण्यात आले आणि दि. २० मार्च, २०१५ रोजी जाहीर सुनावणी घेण्यात आली. आयोगाने २६ जून २०१५ रोजी खालील निर्देशांसह आदेश पारित केले :

१) आयोगाने अंतिम अचूक समायोजनानंतर आर्थिक वर्ष २०१२-१३ आणि आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी अनुक्रमे महसुली तूट रु. १३२.९४ कोटी आणि महसुली शिल्लक रु. २३७.४० कोटी मंजूर केले.

२) एटीई च्या निकालाच्या परिणामासह मागील वर्षांची महसुली शिल्लक विचारात घेऊन, आयोगाने, टीपीसी-पारेषणने आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता मागणी केलेल्या रु. ६९४.३१ कोटींच्या नक्त एकूण महसुली गरजे ऐवजी रु. ३४९.९७ कोटींच्या नक्त एकूण महसुली गरजेस मंजुरी दिली.

३) ज्या भांडवली खर्चाच्या (कॅपेक्स) योजनांना आधी तत्वत: मान्यता देण्यात आली होती आणि ज्यांचे नियंत्रण कालावधीदरम्यान भांडवलीकरण करावयाचे होते, परंतु त्या सुरु झालेल्या नाहीत, अशा योजनांमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे का किंवा त्यांची आवश्यकता आहे का, याबाबत आयोगाने टीपीसी-पारेषणला नव्याने विचार करण्याचे आणि त्याचा सविस्तर अहवाल आयोगाला सादर करण्याचे निर्देश दिले.

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. ( महापारेषण )ची मध्यावधी आढाव्यासाठी याचिका ( सन २०१४ चे प्रकरण क्र. २०७ )**

या प्रकरणी दि. २४ डिसेंबर, २०१४ रोजी तांत्रिक वैधता सत्र पार पडले. आयोगाने दि. १३ फेब्रुवारी, २०१५ रोजी याचिका दाखल करुन घेतली. त्यावर जनतेकडून अभिप्राय मागविण्यात आले आणि दि. ११ मार्च, २०१५ रोजी जाहीर सुनावणी घेण्यात आली. आयोगाने २६

जून २०१५ रोजी खालील निर्देशांसह आदेश पारित केला :

१) आयोगाने महापारेषण कंपनीला त्यांनी वापर न केलेले बेज, ज्यासाठी आयोगाकडून खर्चास परवानगी नाकारण्यात आली होती त्यांना, उपयोगात आणण्यासाठी महावितरण कंपनीकडे पाठपुरावा करण्याचे निर्देश दिले.

२) आयोगाने निर्देश दिले की, वितरण परवानाधारकाच्या वापरासाठी समाविष्ट केलेल्या कॅपेक्स योजनांच्या प्रस्तावासोबत, अशा परवानाधारकाने, त्या योजनेची आवश्यकता आणि योजना पूर्ण झाल्यावर ताबडतोब मत्तांचा उपयोग करण्याची तयारी असल्याची पुष्टी देणारे बांधिलकी पत्र पाठविणे, आवश्यक आहे. असे पत्र नसल्यास आयोग अशा योजनांना तत्वत: मान्यता देणार नाही. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या बळकटीकरणासाठी घेतलेल्या योजनांसाठी अशा बांधिलकी पत्राची गरज भासणार नाही. वितरण परवानाधारकाने जर, असे बांधिलकी पत्र देऊनही, कोणत्याही पुरेशा समर्थनाशिवाय मत्तांचा समयोचित वापर करण्यात कसूर केली तर, आयोग त्याला भविष्यात उचित दंड आकारण्याचा विचार करील.

३) आयोगाने आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता रु. २६८३.९४ कोटींच्या एकूण महसुली गरजेच्या सुधारित अंदाजांना मंजुरी दिली, ज्यामध्ये कॅरींग कॉस्टसह मागील महसुली तूट/शिलकीची वसुली आणि सन २०१४ च्या प्रकरण क्र. ७९ मधील पुनर्विलोकन आदेशातून उद्‌भवलेल्या सुधारीत मान्यतांच्या परिणामांचा समावेश आहे.

**राज्यांतर्गत पारेषण दराचा मध्यावधी आढावा ( सन २०१५ चे प्रकरण क्र. ५७ )**

आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता एकूण पारेषण यंत्रणा खर्च (टीटीएससी) आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेसाठी पारेषण दर निश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ, आयोगाकडून, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा भाग असलेल्या विविध पारेषण परवानाधारकांच्या मध्यावधी आढावा/ बहु-वर्षीय वीज दर आदेशामध्ये अलीकडेच मंजुरी दिलेली एकूण महसुली गरज विचारात घेण्यात आली.

सुधारित टीटीएससी आणि बेस पारेषण क्षमता वापर यांच्या आधारे, आयोगाने आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या उपयोगकर्त्यासाठी (म्हणजे वितरण परवानाधारक आणि अन्य), रु. १९४.७९ प्रति किलोवॅट प्रति महिना (मागील रु. ३६७.१९ प्रति किलोवॅट प्रति महिना च्या ऐवजी) इतका दीर्घ-कालिन/मध्यम-कालिन पारेषण दर आणि रु. ०.२६ प्रति युनिट (मागील रु. ०.४९ प्रति युनिट ऐवजी) इतका अल्प-कालिन पारेषण दर निश्चित केला.

राज्य पारेषण कंपनीला (एसटीयु) खालील निर्देश देण्यात आले:

१) आयोगाने एसटीयुला मागील प्रदानांच्या थकबाकी आणि भविष्यातील विलंब कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत त्यांच्या सूचना याचिकेद्वारे आयोगाकडे सादर करण्याचे निर्देश दिले. महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र आणि वितरण व पारेषण परवानाधारक यांना पक्षकार करता येईल.

२) एसटीयुने राज्यस्तरावर जोडणीचे ठिकाण (पीओसी) पध्दत सुरु करण्यासंबंधात केलेल्या अभ्यासाचा अहवाल आयोगाला ३१ ऑगस्ट, २०१५ पर्यंत सादर करावा.

**महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राची ( एमएसएलडीसी ) आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता कामकाज खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळण्यासाठी याचिका ( सन २०१४ चे प्रकरण क्र. २१८ )**

या प्रकरणी जनतेकडून अभिप्राय मागविण्यात आले आणि दि. १८ जून, २०१५ रोजी जाहीर सुनावणी घेण्यात आली. आयोगाने २६ जून २०१५ रोजी खालील निर्देशांसह आदेश पारित केला :

१) सध्याच्या व्यवस्थेस (एसटीयु म्हणजेच महापारेषण कंपनीकडून चालविण्यात येत असलेल्या एमएसएलडीसीच्या व्यवस्थेस), विद्युत अधिनियम, २००३, च्या कलम ३१ (२) च्या परंतुकान्वये एक अंतरिम उपाययोजना म्हणून, कलम ३१(२) अंतर्गत

अभिप्रेत असल्यानुसार एका स्वतंत्र शासकीय कंपनीकडून तिचा कारभार पाहणे प्रलंबित राहिल्यामुळे, परवानगी देण्यात आली आहे. याचा संबंध भारत सरकारच्या विद्युत मंत्रालय, विविध समित्या आणि केंद्रीय विद्युत नियामक आयोग (सीईआरसी) यांनी स्वातंत्र्य आणि रिंग-फेन्सिंग संदर्भात दिलेल्या सल्ल्याशी येतो. विद्युत अधिनियम, २००३ मध्ये अंमलात येऊन १२ वर्षे लोटल्यानंतर देखील महाराष्ट्रात हे काम होणे अद्याप बाकी असताना, राष्ट्रीय आणि विभागीय भार प्रेषण केंद्रांचा कारभार एका स्वतंत्र शासकीय कंपनीकडून (पॉवर सिस्टम ऑपरेशन कॉर्पोरेशन लि. – पोसोको) व्हावयास याआधीच सुरुवात झाली आहे. पोसोको सध्या पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. (पीजीसीआयएल) ची एक उप-कंपनी आहे, परंतु लवकरच ती पीजीसीआयएल पासून देखील स्वतंत्र असलेली एक शासकीय कंपनी होण्याची अपेक्षा आहे. एमएसएलडीसी आणि महापारेषण कंपनी यांनी ही स्थिती आणि हे अभिप्राय राज्य शासन आणि एमएसइबी होल्डींग कंपनी यांच्या निदर्शनास आणून द्यावेत.

२) आयोगाने एमएसएलडीसीला निर्देश दिले की, त्यांनी खर्च-लाभ विलेषण (सीबीए) अहवालात त्यांच्या कॅपेक्स योजनेतील कोणत्याही योजनेच्या खर्चात झालेल्या वाढीचे विलेषण, सामग्रीचे दर आणि परिमाण यातील बदल, कामगारांच्या मजुरीतील बदलाचे दर आणि कोणत्याही अनियोजित कार्याशी संबंध लावता येईल अशा विगतवारीसह सादर करावे.

३) आयोगाने आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी अचूक समायोजनावर रु. ४४२.८६ लाखांच्या महसुली शिलकीस, आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी एमएसएलडीसीच्या कामगिरीच्या खर्चासाठीच्या अंदाजपत्रकाच्या माध्यमातून वसूल करावयाच्या देणे असलेल्या व्याजासह (होल्डिंग कॉस्ट), मंजुरी दिली.

४) आयोगाने आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता एमएसएलडीसीच्या रु. ४०१५.६८ लाखांच्या अंदाजपत्रकास मंजुरी दिली. तथापि, रु. २१६०.६१ लाखांचे अचूक समायोजन विचारात घेऊन, आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता एमएसएलडीसीचा शुल्क आणि आकारापासून मिळणारा मान्यताप्राप्त महसूल रु. १८५५.०७ इतका आहे.

## विजेचे वितरण

**महावितरण कंपनीची आर्थिक वर्ष २०१३-१४ ते २०१५-१६ करिता एकूण महसुली गरज आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या वीज दरास मंजुरी मिळविण्यासाठी बहु-वर्षीय वीज दर याचिका ( सन २०१४ चे प्रकरण क्र. १२१ )**

महावितरण कंपनीची बहु-वर्षीय वीज दराची याचिका आयोगाने १३ फेब्रुवारी, २०१५ रोजी दाखल करुन घेतली. आयोगाने जनतेचे अभिप्राय मागविले आणि दि. १८ मार्च, २०१५ ते १० एप्रिल, २०१५ या कालावधी दरम्यान अमरावती, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, पुणे आणि नवी मुंबई येथे जाहीर सुनावण्या घेतल्या. या प्रकरणी १ जून, २०१५ पासून अंमलात येणाऱ्या सुधारित वीज दरासह दि. २६जून, २०१५ रोजी बहु-वर्षीय वीज दराचा आदेश पारित करण्यात आला.

महावितरण कंपनीने याचिकेत अंदाजित केलेल्या रु. ४,७१७ कोटींच्या संचयी महुसली तुटीच्या ऐवजी महावितरण कंपनीची कामगिरी आणि तिचे अंदाजित महसूल व खर्च यांच्या सविस्तर विलेषणाच्या आधारे, आयोगाने आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता रु.३,३७६ कोटींच्या संचयी महसुली शिलकीस मान्यता दिली. याचिका दाखल करण्याच्या वेळी प्रचलित असलेल्या वीज दरात महावितरणने आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता ७.९४ टक्क्यांची सरासरी वाढ मागितली होती. त्या ऐवजी, आयोगाने ५.७५ टक्क्यांची सरासरी कपात मंजूर केली.

ही कपात मुख्यत्वेकरुन खालील कारणांसाठी होती :-

१) आयोगाने आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता वीज खरेदीच्या गरजेच्या अंदाजाकरिता कमी खर्चाची वीज प्रथम खरेदी करण्याचे तत्त्व (मेरीट ऑर्डर डिस्पॅच) अवलंबिले. महावितरणने अंदाजित केलेली, पण त्यांनी या अंदाजांना पुष्टी दिली नसल्याने, आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या दुसऱ्या सहामाहीतील कृषी विक्रीतील वाढ विचारात घेण्यात आली नाही. परिणामत: रु. ५,३३१

कोटींचा वीज खरेदी खर्च नाकारण्यात आला.

२) आयोगाने, अलीकडेच दिलेल्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वीज दर आदेशामध्ये, महावितरणने आर्थिक वर्ष २०१५-१६ साठीच्या याचिकेत मागितलेल्या रु. ६,२९४ कोटींच्या पारेषण आकारांपेक्षा खूपच कमी म्हणजे, महावितरणसाठी रु. ३,६०१ कोटींच्या पारेषण आकारांना मान्यता दिली. त्यामुळे पारेषण आकारांमध्ये रु. २,६९३ कोटींची कपात झाली.

३) विलंब भरणा आकारांपोटी (डीपीसी) निर्मिती कंपन्या आणि पारेषण परवानाधारकांना देय म्हणून महावितरणने मागितलेले रु.१,९०९ कोटी आयोगाने नाकारले. उशीरा प्रदाने करण्यामुळे द्याव्या लागणाऱ्या विलंब भरणा आकारांबाबत आणि संबंधित वीज निर्माते व पारेषण परवानाधारक यांच्या आर्थिक परिस्थितीवर होणाऱ्या विपरित परिणामाबद्दल आयोगाने काळजी व्यक्त केली.

आयोगाने आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता रु. ६.०३ प्रति युनिट प्रमाणे महावितरणच्या वीज पुरवठ्याच्या सरासरी खर्चास (एसीओएस) मंजुरी दिली, महावितरणने मागितलेल्या रु.६.८७ प्रति युनिट पेक्षा ही रक्कम कमी आहे.

आयोगाने, लघु-दाब उद्योग (एलटी-५) या वीज दर वर्गवारी अंतर्गत, लघु-दाब उद्योग-अन्य (एलटी-५ (बी)) च्या उप-वर्गवारीपेक्षा कमी ऊर्जा आकार असलेली, लघु-दाब उद्योग-यंत्रमाग (एलटी-५ (ए)) ही नवीन उप-वर्गवारी निर्माण केली.

आयोगाने, एलटी आणि एचटी वर्गवारी या दोन्ही वर्गवारींतील लोक सेवा वीज दर वर्गवारी - (अ) शासकीय शैक्षणिक संस्था आणि रुग्णालये आणि (ब) अन्य लोक सेवा - या दोन उप-वर्गवारींमध्ये विभाजित केली. या वर्गवारींचे वीज दर शासकीय कंपन्याच्या वीज दरापेक्षा कमी आणि वीज पुरवठ्याच्या सरासरी खर्चाच्या नजिकचे असतील.

रात्रीच्या वेळी विजेची सर्वोच्च मागणी नसलेल्या काळात टीओडी रिबेटमध्ये प्रति युनिट २५० पैशांवरुन १५० पैसे इतकी कपात करण्याचा महावितरणचा प्रस्ताव आयोगाने स्वीकारला. सर्वोच्च मागणी नसलेल्या तासां दरम्यान टीओडी रिबेटमधील कपात त्याच वीज दर वर्गवारीतील ऊर्जा आकार कमी करण्यासाठी वापरण्यात आली. प्रोत्साहन-अधिदानात कपात करण्या संबंधातील अन्य सर्व प्रस्ताव नाकारण्यात आले.

आयोगाने असे निरीक्षण नोंदवले की, मुक्त प्रवेशावर विपरित परिणाम करणारे त्यावेळचे अन्य घटक विचारात घेता, क्रॉस-सबसिडी अधिभार (सीएसएस) निश्चित करण्याचे सध्याचे सूत्र, मुक्त प्रवेश ग्राहकांसमोरील मुख्य अडचण होती. त्यामुळे, हे सूत्र लागू करण्याऐवजी, आयोगाने आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी वीज दर वर्गवारी-निहाय सरासरी आकारणी दर (एबीआर) आणि वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च (एसीओएस) मधील फरकाच्या ७५ टक्क्यांवर क्रॉस सबसिडी अधिभाराची परिगणना केली. यामुळे क्रॉस सबसिडी अधिभाराचे आधीचे सूत्र लागू करण्यामधून झालेला परिणाम सौम्य होईल आणि मुक्त प्रवेश सुकर होईल अशी अपेक्षा होती. क्रॉस सबसिडी अधिभार निश्चित करण्याचा हाच दृष्टीकोन अन्य वितरण परवानाधारकांना देखील लागू करण्यात आला.

ग्राहक वर्गवारींमधील वीज दरांतील क्रॉस सबसिडीच्या पातळया, शक्य होईल तितक्या, वीज पुरवठाच्या सरासरी खर्चाच्या ±२० टक्क्यांच्या मर्यादेत कमी करण्याची आयोगाने काळजी घेतली. जेथे क्रॉस-सबसिडीची पातळी कमी करणे शक्य झाले नाही तेथे क्रॉस सबसिडी विद्यमान पातळ्यांवर ठेवण्यात आली.

### आरइन्फ्रा-वितरणची मध्यावधी आढाव्यासाठी याचिका ( सन २०१५ चे प्रकरण क्र. ४ )

आयोगाने दि. १३ फेब्रुवारी, २०१५ रोजी याचिका दाखल करुन घेतली. तांत्रिक वैधता सत्र आयोजित केल्यावर आयोगाने जनतेचे अभिप्राय मागविले आणि १६ मार्च, २०१५ रोजी जाहीर सुनावणी घेतली. आयोगाने २६ जून २०१५ रोजी वीज दराचा आदेश पारित केला, ज्यातील सुधारीत वीज दर १ जून, २०१५ पासून अंमलात येणार होते.

आरइन्फ्रा-वितरण त्यांच्या स्वत:च्या डहाणू औष्णिक विद्युत केंद्रातून (डीटीपीएस) आणि आरइन्फ्रा-वितरणाची अप्रत्यक्ष मालकी नियंत्रण असलेल्या व्हीआयपीएल-निर्मितीकडून दीर्घ-कालिन तत्त्वावर वीज खरेदी करते. आरइन्फ्रा-वितरणने त्यांच्या आणि व्हीआयपीएल मधील वीज खरेदी करारास (पीपीए) मंजुरी मिळण्यासाठीच्या आपल्या आधीच्या याचिकेत, असे अंदाजित केले होते की, व्हीआयपीएल-

निर्मिती कोल इंडिया लि. (सीआयएल)च्या उप-कंपन्यांशी झालेल्या इंधन पुरवठा करारांतर्गत (एफएसए) देशी कोळसा प्राप्त करील, आणि आयोगाने त्या आधारावर कोळशाच्या संभाव्य किमतीची रुपरेखा विचारात घेऊन 'पीपीए'ला मंजुरी दिली. तथापि, व्हीआयपीएलने एफएसए केला नाही आणि अन्य स्त्रोतांकडून अधिक महाग कोळसा विकत घेतला. त्यामुळे, आरइन्फ्रा-वितरणच्या आधीच्या बहु-वर्षीय वीज दर आदेशात मंजुरी दिलेल्या वीज खरेदी खर्चाच्या तुलनेत प्रत्यक्ष वीज खरेदी खर्चात मोठी वाढ झाली. ही वाढ ग्राहकांकडून वसूल करण्याचे आरइन्फ्रा-वितरणने प्रस्तावित केले. आरइन्फ्रा-वितरणने 'पीपीए'पासून फारकत घेण्यासाठी आणि मंजूर झालेल्या वीज खरेदी खर्चापेक्षा १०५ टक्के अधिक वीज खरेदी खर्च करण्यासाठी आयोगाकडे पूर्व-परवानगी मागितलेली नव्हती. या परिस्थितीत, ग्राहकांवर हा अतिरिक्त बोजा लादण्यापेक्षा, आयोगाने व्हीआयपीएलकडून वीज खरेदी करण्याच्या खर्चावर मर्यादा घातली.

आरइन्फ्रा-वितरणने आर्थिक वर्ष २०१२-१३ ते २०१५-१६ पर्यंतच्या कालावधीसाठी मागितलेल्या रु. १९४७ कोटीं ऐवजी रु. ३१३ कोटींच्या संचयी महसुली तुटीस मान्यता दिली. त्यानुसार, आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च, आरइन्फ्रा-वितरणने मागितलेल्या प्रति युनिट रु.१०.२८ ऐवजी प्रति युनिट रु. ८.२३ इतका काढण्यात आला. आयोगाने आरइन्फ्रा-वितरणच्या सरासरी वीज दरामध्ये ५.२ टक्क्यांच्या वाढीस मंजुरी दिली.

अन्य वितरण परवानाधारकांप्रमाणे, एलटी आणि एचटी वर्गवारी या दोन्ही वर्गवारींतील 'लोक सेवा' वीज दर वर्गवारी अंतर्गत 'शासकीय शैक्षणिक संस्था आणि रुग्णालये' ही नवीन उप-वर्गवारी निर्माण करण्यात आली. या वर्गवारीचा वीज दर वीज पुरवठ्याच्या सरासरी खर्चाच्या नजिक ठेवण्यात आला.

आयोगाने वेगवेगळ्या ग्राहक वर्गवारीच्या वीज दरामधील क्रॉस-सबसिडीच्या पातळ्या कमी केल्या आणि त्या शक्य होईल तितके वीज पुरवठ्याच्या सरासरी खर्चाच्या ±२० टक्क्यांच्या मर्यादेत ठेवल्या आहेत. जेथे क्रॉस-सबसिडी कमी करणे शक्य झाले नाही तेथे क्रॉस सबसिडी विद्यमान पातळ्यांवर ठेवण्यात आली.

चेंज-ओव्हर आणि मुक्त प्रवेश ग्राहकांच्या देयकावर क्रॉस-सबसिडीच्या अधिभाराचा मोठा परिणाम होतो हे विचारात घेऊन आयोगाने, अन्य वितरण परवानाधारकांप्रमाणे, क्रॉस सबसिडीच्या अधिभाराच्या परिगणनेच्या सूत्रामध्ये फेरबदल केला.

**टीपीसी-वितरणची मध्यावधी आढाव्यासाठी याचिका ( सन २०१५ चे प्रकरण क्र. १८ )**

टीपीसी-वितरणच्या मध्यावधी आढाव्यासाठी दि. २४ फेब्रुवारी, २०१५ रोजी याचिका दाखल करुन घेण्यात आली. आयोगाने जनतेचे अभिप्राय मागविले आणि २० मार्च, २०१५ रोजी जाहीर सुनावणी घेतली. आयोगाने २६ जून २०१५ रोजी, १ जून, २०१५ पासून अंमलात येणाऱ्या सुधारीत वीज दरासह आदेश पारित केला.

टीपीसी-वितरणने आर्थिक वर्ष २०१२-१३ ते २०१५-१६ पर्यंतच्या कालावधीसाठी मागितलेल्या रु. १६७३ कोटीं ऐवजी रु. ७६० कोटींच्या संचयी महसुली तुटीस मंजुरी दिली. त्यानुसार, आयोगाने आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च, टीपीसी-वितरणने मागितलेल्या प्रति युनिट रु.१०.११ ऐवजी, प्रति युनिट रु. ७.७१ इतका निश्चित केला. सरासरी वीज दरामध्ये ३.९ टक्के इतकी वाढ झाली.

अन्य वितरण परवानाधारकांप्रमाणे, एलटी आणि एचटी वर्गवारी या दोन्ही वर्गवारींतील 'लोक सेवा' वीज दर वर्गवारी अंतर्गत 'शासकीय शैक्षणिक संस्था आणि रुग्णालये' ही नवीन उप-वर्गवारी निर्माण करण्यात आली. या वर्गवारीचा वीज दर वीज पुरवठाच्या सरासरी खर्चाच्या नजिक होता.

आपल्या अन्य बहु-वर्षीय वीज दराच्या आदेशांप्रमाणे, आयोगाने वेगवेगळ्या ग्राहक वर्गवारीच्या वीज दरामधील क्रॉस-सबसिडीच्या पातळ्या कमी केल्या आणि त्या शक्य होईल तितके वीज पुरवठ्याच्या सरासरी खर्चाच्या ±२० टक्क्यांच्या मर्यादेत ठेवल्या आहेत. जेथे क्रॉस-सबसिडी कमी करणे शाय्य झाले नाही तेथे क्रॉस सबसिडी विद्यमान पातळ्यांवर ठेवण्यात आली.

चेंज-ओव्हर आणि मुक्त प्रवेश ग्राहकांच्या देयकावर क्रॉस-सबसिडीच्या अधिभाराचा मोठा परिणाम होतो हे विचारात घेऊन आयोगाने, अन्य वितरण परवानाधारकांप्रमाणे, क्रॉस सबसिडीच्या अधिभाराच्या परिगणनेच्या सूत्रामध्ये फेरबदल केला.

## परवाना मंजूरी

**आरइन्फ्रा-पारेषण ची पारेषण परवाना क्र. सन २०११ चा १ मध्ये सुधारणा करण्यासाठी याचिका ( सन २०१५ चे प्रकरण क्र. २४ )**

आरइन्फ्रा-पारेषणला दि. ११ ऑगस्ट, २०११ रोजी पारेषण परवाना क्र. सन २०११ चा १ मंजूर करण्यात आला. हा परवाना आरइन्फ्रा-पारेषण आणि डहाणू-टीपीएस तसेच टीपीसी-पारेषण आणि महापारेषण यांच्या पारेषण जाळयाशी आंतर-जोडणी करणारा वाहिनी-विशिष्ट परवाना आहे.

राज्य पारेषण कंपनी (एसटीयु) ने मुंबईतील पारेषण जाळयाच्या बळकटीकरणासाठी आरइन्फ्रा-वितरणचे २२० केव्ही साकी उप-केंद्र टीपीसी-वितरणच्या २२० केव्ही साकी केंद्राशी जोडणाऱ्या डबल सर्किट २२० केव्ही पारेषण वाहिनीस मंजुरी दिली. ही वाहिनी आरइन्फ्रा-पारेषणच्या पारेषण परवान्याचा भाग नसल्यामुळे, आरइन्फ्रा-पारेषणने ही प्रस्तावित पारेषण वाहिनी समाविष्ट करण्यासाठी त्यांच्या परवान्यात सुधारणा करण्याकरिता दि. २ फेब्रुवारी, २०१५ रोजी अर्ज केला.

सन २०१२च्या प्रकरण क्र. १२० मध्ये नियुक्त केलेल्या समितीने पारेषण जाळयामध्ये आणिबाणीच्या काळात उपयोगात आणण्यासाठी जास्तीची किंवा पर्यायी व्यवस्था असावी म्हणून, आरइन्फ्राच्या २२० केव्ही साकी उप-केंद्र ते टीपीसी २२० केव्ही साकी उप-केंद्रामध्ये आंतरजोडणी लवकर पूर्ण करण्याची शिफारस केली होती. एसटीयु ने देखील सदर आंतरजोडणी योजनेची शिफारस केली होती. आरइन्फ्रा-पारेषण ने खर्च-लाभ विलेषणासह भांडवली खर्चाचा त्यांचा प्रस्ताव सादर केला होता आणि आयोगाने त्यास तत्त्वत: मान्यता दिली. या योजनेचे कार्यान्वयन प्रगत अवस्थेत आहे.

ही वस्तुस्थिती विचारात घेऊन, आयोगाने दि. १४ मार्च, २०१६ रोजीच्या आदेशान्वये, आरइन्फ्रा-पारेषणने प्रस्तावित केल्यानुसार पारेषण परवान्यात सुधारणा केली.

**अदानी ट्रान्समिशन ( इंडिया ) लि. ( एटीआयएल ) ची पारेषण परवाना क्र. सन २००९ चा २ मध्ये सुधारणा करण्यासाठी याचिका ( सन २०१४ चे प्रकरण क्र. १३६ )**

अदानी पॉवर लिमिटेडची उप-कंपनी असलेल्या, अदानी पॉवर महाराष्ट्र लि. (एपीएमएल)ला दि. ६ जुलै, २००९ रोजी पारेषण परवाना क्र. सन २००९ चा २ मंजूर करण्यात आला होता. कंपनीच्या ७६५ केव्ही पारेषण यंत्रणेच्या प्रस्तावित विकासाचा विचार करुन, खालील पारेषण वाहिन्या आणि संबंधित पायाभूत सुविधा उभारण्यासाठी आणि चालविण्यासाठी दि. ३० मार्च, २०११ रोजी पारेषण परवान्यात सुधारणा करण्यात आली.

- तिरोडा (गोंदिया) ते ४०० केव्ही वरोरा स्विचिंग स्टेशनर्यंत क्वॉड कंडक्टरसह ४०० केव्ही डबल सर्किट पारेषण वाहिनी
- तिरोडा प्रकल्प स्वीचयार्ड येथे वरील दोन तिरोडा-वरोरा डबल सर्किट पारेषण वाहिन्यांसाठी दोन ४०० केव्ही बेज
- वरोरा स्विचिंग केंद्र येथे तिरोडा-वरोरा डबल सर्किट पारेषण वाहिन्यांसाठी दोन ४०० केव्ही बेज

आयोगाने यापूर्वी एटीआयएलच्या नावे, एपीएमएलचा पारेषण परवाना क्र. २००९ चा २ आणि वरील पारेषण मत्तांचे, अभिहस्तांकन करण्यास परवानगी दिली होती.

तिरोडा-वरोरा पारेषण यंत्रणा सुरु करण्याच्या वेळी, वर्धा-वरोरा क्षेत्रात उच्च दाब असल्याचे निदर्शनास आले. तिरोडा येथे बस रिॲक्टर्सची स्थापना करुन त्यांच्या परिणामांची तीव्रता कमी करणे आवश्यक ठरले. पश्चिम विभागीय भार प्रेषण केंद्राने (डब्ल्युआरडीसी) ४०० केव्ही तिरोडा-वरोरा पारेषण वाहिनी विद्युतभारित करण्यापूर्वी यंत्रणेचे विश्लेषण केले होते. तेव्हा वरोरा उप-केंद्रामधून वाहिनी विद्युत भारित करण्याने ओपन एण्ड व्होल्टेज ४३० केव्हीपर्यंत वाढेल, असे निदर्शनास आले होते. या अभ्यासात स्पष्ट झाले की, २ X ८० एमव्हीएआर बस रिॲक्टर्स ने, वरोरा आणि तिरोडा उप-केंद्रातील व्होल्टेज अनुक्रमे ४१० केव्ही आणि ४०१ केव्ही होईल.

त्यानुसार, एटीआयएल ने तिरोडा उप-केंद्रात २६ ऑगस्ट, २०१२ रोजी दोन बस रिॲक्टर्ससह पारेषण यंत्रणा सुरु केली होती. एमएसएलडीसी च्या सूचनांनुसार बस रिॲक्टर्सचे संचालन करण्यात आले होते. पारेषण यंत्रणा भारित करण्यासाठी आणि तिचे संचालन करण्यासाठी बस रिॲक्टर्स आवश्यक असले तरी पारेषण परवाना क्र. २००९ चा २ मध्ये त्यांचा समावेश करण्यात आला नव्हता.

वरील बाब विचारात घेऊन, एटीआयएलने, तिरोडा उप-केंद्रात संलग्न बेजसह २ X ८० एमव्हीएआर बस रिॲक्टर्सचा समावेश करण्यासाठी, दि. १६ जुलै, २०१४ रोजी त्यांच्या पारेषण परवान्यात सुधारणा करण्याकरिता अर्ज केला.

विविध तांत्रिक अहवालांत आणि डब्ल्युआरएलडीसी व 'एमएसएलडीसी'शी झालेल्या पत्रव्यवहारात अधोरेखित करण्यात आल्यानुसार, पारेषण यंत्रणा सुरळीतपणे चालण्यासाठी तिरोडा येथे दोन बस रिॲक्टर्स सुरु करणे आवश्यक असल्याचे आयोगाला दिसून आले.

बस रिॲक्टर्सची आवश्यकता आणि एसटीयुची शिफारस विचारात घेऊन, आयोगाने, दि. ९ जुलै, २०१५ च्या आदेशान्वये एटीआयएल ने प्रस्तावित केल्यानुसार, पारेषण परवान्यात सुधारणा केली.

**टीपीसी-वितरणची, सन २०१४ च्या प्रकरण क्र. ९० मध्ये दिलेल्या निर्देशांच्या पूर्ततेसाठी, सुधारित विद्युत जाळे उभारणीच्या आराखड्यास मंजुरीसाठी याचिका (सन २०१४ चे प्रकरण क्र. १८२)**

आयोगाने, सन २०१४ च्या प्रकरण क्र. ९० मध्ये दिनांक १४ ऑगस्ट, २०१४ रोजी दिलेल्या आदेशात टाटा पॉवर कंपनी लिमिटेडला (टीपीसी-वितरण) १६ ऑगस्ट, २०१४ पासून २५ वर्षांसाठी मुंबई शहर, मुंबई उपनगर क्षेत्रातील काही भाग आणि मिरा-भाईंदर महानगरपालिका, त्यामध्ये नंतर समाविष्ट झालेल्या चेने व वेसावे गावासह, या क्षेत्रांमध्ये विजेचे वितरण करण्यासाठी, वितरण परवाना मंजूर केला होता. टीपीसी-वितरणने त्यांच्या परवाना अर्जात प्रस्तावित केलेल्या अतिरिक्त वितरण जाळ्यामधील काही त्रुटी विचारात घेऊन, टीपीसी-वितरणला सुधारित विद्युत जाळे उभारणीचा आराखडा स्वतंत्रपणे मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार, टीपीसी-वितरणने विद्युत जाळे उभारणीचा सुधारीत आराखडा प्रस्तावित करणारी एक याचिका (सन २०१४ चे प्रकरण क्र. १८२) दाखल केली. तथापि, विद्युत अपिल न्यायाधिकरणाने (एटीई) आधीच्या प्रकरणामधील अपील क्र. २०१२ चे २२९ आणि २४६ दि. २८ नोव्हेंबर, २०१४ रोजी निकालात काढले आणि टीपीसी-वितरणचा विद्युत जाळे उभारणीचा आराखडा कोणत्या तत्त्वांवर असावयास हवा या संबंधात काही निर्देश दिले आणि आरइन्फ्रा-वितरणच्या आणि त्यांच्या समान परवाना क्षेत्रातील अर्जदारांना विजेचा पुरवठा करण्याच्या संबंधात निरीक्षणे नोंदवली. एटीई चा निकाल विचारात घेऊन, टीपीसीने दि. १२ फेब्रुवारी, २०१५ रोजी आयोगासमोर विद्युत जाळे उभारणीचा आणखी सुधारणा केलेला आराखडा सादर केला.

मुंबईतील अन्य वितरण परवानाधारकांनी देखील टीपीसीच्या विद्युत जाळे उभारणीच्या आराखड्यावर त्यांची निवेदने दाखल केली. ग्राहक निवड, विद्युत जाळ्याची पुनरावृत्ती, विद्यमान जाळ्याची विश्वासार्हता, एटीईच्या निकालाचा अन्वयार्थ, खर्चाचा इष्टतम उपयोग इ. मुद्दे या कामकाजा दरम्यान उपस्थित करण्यात आले. विद्युत जाळ्याचा विस्तार आणि अर्जदारांना विजेचा पुरवठा यासंबंधीचे परिचलनात्मक विशिष्ट प्रश्न सोडविण्यासाठी आणि त्यांस अंतिम स्वरुप देण्यासाठी, आयोगाने दि. ९ नोव्हेंबर, २०१५ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशामध्ये, नवीन विद्युत जोडण्यांसाठी कार्यपध्दती आणि प्रक्रिया, सामायिक परवाना क्षेत्रात एका परवानाधारकाकडून दुसऱ्या परवानाधारकाकडे ग्राहकांचे स्थलांतर, या बाबी कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेली संस्थात्मक यंत्रणा, परवानाधारकाच्या वितरण जाळ्याची

पर्याप्तता निश्चित करण्यासाठीची पध्दत, आणि बेस्टच्या पुरवठा क्षेत्रासाठी माहिती, यासारख्या प्रश्नांवर शिफारशी करण्यासाठी एक समिती गठीत केली. अंतरिम आदेशात असे नमूद करण्यात आले की, आवश्यकता असल्यास, या समितीच्या मान्यता देण्यात आलेल्या शिफारशींनुसार टीपीसी-वितरणला विद्युत जाळे उभारणीच्या आराखड्यात सुधारणा करण्यास सांगण्यात येईल. अंतरिम आदेशात असेही नमूद करण्यात आले की, अंतिम आदेश पारित करण्यापूर्वी, टीपीसी-वितरणच्या विद्युत जाळे उभारणीचा सुधारित आराखडा व समितीच्या शिफारशींवर, हितसंबंधित आणि सामान्य जनतेकडून अभिप्राय मागविण्यात येतील आणि जाहीर सुनावणी घेण्यात येईल.

**गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. ( जीइपीएल ) ची, ऐरोली नॉलेज पार्क, जिल्हा ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी त्यांचा मानीव वितरण परवानाधारकाचा दर्जा अभिलेख्यावर घेण्यासाठी आणि त्यांना विशिष्ट अटी ठरवून देण्यासाठी याचिका ( सन २०१४ चे प्रकरण क्र. १९८ )**

जीइपीएल, ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली गाव, जिल्हा ठाणे, महाराष्ट्र, येथील माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवांकरिता, सेज अधिनियम, २००५ च्या कलम ३ अंतर्गत, क्षेत्र-विशिष्ट विशेष आर्थिक क्षेत्राची उभारणी करीत आहे.

भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि औद्योगिक मंत्रालयाकडून मान्यता दि. ११ एप्रिल, २०१३ च्या पत्रान्वये जीईपीएल यांना या विशेष आर्थिक क्षेत्राचा (सेज) विकास, संचालन आणि देखभाल करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. या मंत्रालयाकडून दि. ११ जून, २०१३ च्या एस.ओ.१६९५(इ) अधिसूचने अन्वये त्यांना या क्षेत्राचा विकासक म्हणून देखील अधिसूचित करण्यात आले आहे.

सेज अधिनियम, २००५ च्या कलम ४९(१)(बी) अंतर्गत दि. ३ मार्च, २०१० रोजीच्या अधिसूचनेद्वारे, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४(बी) मध्ये परंतुकाची भर घालण्यात आली, ज्यामुळे सेजच्या विकासकाला वितरण परवानाधारक म्हणून मानण्यात आले. त्यामुळे जीइपीएल त्यांच्या सेज क्षेत्रासाठी मानीव वितरण परवानाधारक आहेत. त्यानुसार, जीइपीएलने उपरोक्त सेज क्षेत्रासाठी त्यांचा विकासक म्हणून मानीव वितरण परवानाधारकाचा दर्जा अभिलेख्यावर घेण्यासाठी आणि त्यांस लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी निर्गमित करण्यासाठी एक याचिका दाखल केली. त्यानंतर, त्यांनी, त्यांच्या परवाना क्षेत्रातील ग्राहकांना महावितरण कंपनीच्या परवाना क्षेत्रातील संबंधित वर्गवारीच्या ग्राहकांना लागू असलेल्या वीज दरा इतक्या कमाल मर्यादा वीज दराने, वीज दर आकारण्याची देखील, एक अंतरिम व्यवस्था म्हणून, परवानगी देण्यात यावी आणि त्यानुसार त्यांच्या वीज दराची अनुसूची व आकारांच्या अनुसूचीला मंजुरी देण्यात यावी, यासाठी एक सुधारित याचिका दाखल केली.

आयोगाच्या असे निदर्शनास आले की, जीइपीएल, सेज क्षेत्राचा विकासक असल्यामुळे, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ अंतर्गत, मानीव वितरण परवानाधारक आहे. जीइपीएलने त्यांच्यावरील जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी निश्चित योजना देखील सादर केली होती. त्यानुसार, आयोगाने, दि. २६ ऑक्टोबर, २०१५ च्या आदेशान्वये, सदर सेज क्षेत्रासाठी मानीव वितरण परवानाधारक म्हणून जीइपीएलच्या दर्जास पुष्टी दिली.

जीइपीएलला सहा महिन्यांच्या आत ग्राहक गाऱ्हाणे निवारण यंत्रणा स्थापन करण्याचे आणि अन्य आवश्यकतांची पूर्तता करण्याचे निर्देश देण्यात आले. जीइपीएलला, वीज खरेदी कराराच्या मंजुरीसाठी आणि भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कलम ६३ अंतर्गत स्पर्धात्मक बोलीच्या माध्यमातून मिळालेल्या वीज दराच्या स्वीकृतीकरिता, चार महिन्यांच्या आत याचिका दाखल करण्याचे देखील निर्देश देण्यात आले. आयोगाकडून वीज खरेदी करारास मान्यता आणि वीज दरास स्वीकृती मिळाल्यापासून तीन महिन्याच्या आत प्रस्तावित आकारांच्या अनुसूचीसह एकूण महसुली गरज आणि ग्राहक वीज दराच्या निश्चितीकरणासाठी याचिका दाखल करावयाची होती.

तोपर्यंत, अंतरिम व्यवस्था म्हणून, जीईपीएलला त्यांच्या ग्राहकांना, महावितरण कंपनीच्या परवाना क्षेत्रातील संबंधित वर्गवारीच्या

ग्राहकांना लागू असलेल्या वीज दराने कमाल मर्यादा वीज दर म्हणून देयकात आकारणी करण्यासाठी आणि महावितरण कंपनीच्या आकारांची अनुसूची लागू करण्याची परवानगी देण्यात आली.

आयोगाने आपल्या आदेशात नमूद केले की, जीइपीएलच्या परवान्याच्या विशिष्ट अटी विनिर्दिष्ट करणारे विनियम स्वतंत्रपणे अधिसूचित करण्यात येतील.

## वीज खरेदी

**आयडियल एनर्जी प्रोजेक्ट लि.च्या बेला, जिल्हा नागपूर येथील कोळशावर आधारित वीज निर्मिती प्रकल्पामधून १७० मेगावॅट विजेसाठी वीज खरेदी कराराच्या मंजुरीसाठी टीपीसी-वितरणची याचिका ( सन २०१५ चे प्रकरण क्र. ६५ )**

टीपीसी–वितरणने नागपूर जिल्ह्यातील बेला गावातील आयडियल एनर्जी प्रोजेक्ट लि.(आयइपीएल)च्या कोळशावर आधारित औष्णिक विद्युत केंद्राच्या संच क्र. १ मधून १७० मेगावॅट वीज खरेदी करण्यासाठी वीज खरेदी कराराच्या (पीपीए) मंजुरीकरिता याचिका दाखल केली.

आयोगाने दि. ६ नोव्हेंबर, २०१५ च्या आदेशान्वये, टीपीसी–वितरण आणि आयइपीएलमध्ये २५ वर्षांसाठी १७० मेगावॅट वीज प्राप्त करण्यासाठी, वीज खरेदी करारास, काही फेरबदलाच्या अधीन राहून, तत्त्वतः मान्यता दिली आणि 'पीपीए'तील अटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून, १ जानेवारी, २०१६ पासून विजेचा पुरवठा सुरु करण्यास परवानगी दिली. आयोगाने टीपीसी–वितरणला एक महिन्याच्या आत अंतिम पीपीए सादर करण्याचे निर्देश दिले.

आयोगाने, आयइपीएलला देखील त्यांच्या वीज निर्मितीचा दर निश्चित करण्यासाठी आयोगाकडे वेगळा अर्ज सादर करण्याचे निर्देश दिले.

**तिरोडा औष्णिक केंद्रामधून विजेचा पुरवठा करण्यासाठी लोहारा कोळसा खाणीतून ८०० मेगावॅटसाठी मंजूर केलेल्या नुकसानभरपाई ऐवजी वेळेच्या प्रत्येक गटामध्ये ५२० मेगावॅट विजेचे समायोजन करण्याच्या संबंधात सन २०१४ च्या प्रकरण क्र. ६३ मध्ये दि. ५.५.२०१४ रोजीच्या आदेशाच्या स्पष्टीकरणासाठी एपीएमएलची याचिका. ( सन २०१५ चे प्रकरण क्र. २८ )**

एपीएमएल ने तिरोडा औष्णिक विद्युत केंद्रातून महावितरणला विजेचा पुरवठा करण्यासाठी सन २०१४ च्या प्रकरण क्र. ६३ मध्ये दि. ५ मे, २०१४ रोजी दिलेल्या आदेशामध्ये लोहारा कोळसा खाणीतून ८०० मेगावॅटसाठी मंजूर केलेल्या नुकसानभरपाई ऐवजी वेळेच्या प्रत्येक गटामध्ये संपूर्ण ५२० मेगावॅट विजेचे समायोजन करण्याच्या संबंधात स्पष्टीकरणासाठी याचिका दाखल केली.

आयोगाने दि. ९ नोव्हेंबर, २०१५ रोजी दिलेल्या आदेशात असा निर्णय दिला की, १०५६ मेगावॅट पेक्षा जास्तीच्या वीज निर्मितीसाठीचा वीज दर कोळशाच्या स्त्रोतांशी निगडीत करण्यात येईल, म्हणजेच, जर लिंकेज कोळसा वापरण्यात आला असेल तर पीपीए मध्ये उल्लेख केलेला वीज दर लागू राहील, आणि अन्य स्त्रोतांपासूनचा कोळसा वापरण्यात आला असेल तर हानिपूरक वीज दर लागू राहील. तथापि, हानिपूरक वीज दर फक्त ८०० मेगावॅट च्या वीज निर्मितीस लागू राहील.

**सिरीन प्रापर्टीज प्रा. लि. ( एसपीपीएल ) ची मार्ग-१ अंतर्गत स्पर्धात्मक बोलीच्या माध्यमातून ५ वर्षांसाठी मध्यम-कालिन वीज खरेदीच्या योजनेस मंजुरीकरिता याचिका ( सन २०१५चे प्रकरण क्र. ४९ )**

एसपीपीएल या विशेष आर्थिक क्षेत्र (सेज) चा विकास करणाऱ्या मानीव वितरण परवानाधारकाने २० मेगावॅट वीज खरेदी करण्यासाठी आणि केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार स्पर्धात्मक बोली प्रक्रियेच्या माध्यमातून एप्रिल, २०१६ पासून ५ वर्षांसाठी मध्यम–कालिन विजेच्या खरेदीकरिता परवानगी मिळण्यासाठी याचिका दाखल केली.

आयोगाने २६ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या आदेशात प्रस्तावास मान्यता दिली आणि वीज खरेदीस प्रारंभ करण्याच्या दिनांकाच्या संबंधात मार्गदर्शक सूचनांपासून घेतलेल्या फारकतीस परवानगी दिली. आयोगाने, मधल्या काळात विजेचा पुरवठा चालू राखण्याच्या उद्देशाने, आधीच्या सन २०१४ च्या प्रकरण क्र. १७८ मध्ये दिलेल्या आदेशात मान्यता दिलेल्या वीज दरापेक्षा जास्त नसलेल्या वीज दराने ३० जून, २०१६ पर्यंत किंवा नवीन स्पर्धात्मक बोली प्रक्रियेवर आधारित मध्यम-कालिन वीज खरेदी सुरु होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल त्यास, परवानगी दिली.

## मुक्त प्रवेश

आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये आयोगाने मुक्त प्रवेशासंबंधी दाखल करण्यात आलेल्या अनेक याचिकांवर आदेश पारित केले. हे आदेश परिशिष्ट १ मध्ये देण्यात आलेल्या यादीत पाहता येतील. यापैकी दोन आदेशांचा सारांश खालीलप्रमाणे आहे. :-

**वितरण मुक्त प्रवेश विनियमांच्या विनियम ३.१ मध्ये सुधारणा करण्यासाठी आणि फ्रॅन्चायसीज् मुक्त प्रवेशासाठी पात्र असल्याबाबतच्या स्पष्टीकरणासाठी शॉपिंग सेंटर्स असोसिएशन ऑफ इंडियाची याचिका ( सन २०१५ चे प्रकरण क्र. २० )**

आयोगाने दि. २८ ऑक्टोबर, २०१५ च्या आदेशात असे स्पष्ट केले होते की, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४ च्या विनियम ३.१ च्या ८व्या परंतुकात, मुक्त प्रवेशासाठी वितरण परवानाधारकाचा फ्रॅन्चायसी पात्र राहणार नाही असे जरी नमूद करण्यात आले असले तरी, विद्युत अधिनियम, २००३ मध्ये व्याख्या केल्यानुसार, अशी कंपनी जर एक ग्राहक असेल तर आणि ती जोपर्यंत अन्य निकषांची पूर्तता करीत असेल तर त्या मर्यादपर्यंत, तिला ग्राहकाच्या वेगळया अधिकारात स्व-वापरासाठी मुक्त प्रवेश मागण्यापासून प्रतिबंध करता येत नाही. तथापि, एक ग्राहक म्हणून ती अशी वीज अन्य ग्राहकांना वितरीत करु शकत नाही. त्यामुळे विनियमांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता नाही.

**महावितरण कंपनीच्या ग्रिडमध्ये अंत:क्षेपित केलेल्या पवन ऊर्जेच्या प्रदानाकरिता श्री एस.के. शिवराज आणि अन्य ९ जणांची याचिका ( सन २०१४ चे प्रकरण क्र. २०९ )**

आयोगाने २३ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या आदेशात आयोगाने, महावितरण कंपनीच्या ग्रिडमध्ये अंत:क्षेपित केलेल्या शिल्लक पवन ऊर्जेसाठी लागू असलेल्या व्याजासह रक्कम प्रदान करण्याचे निर्देश दिले. महावितरण कंपनीने याबाबत आढावा घ्यावा आणि अशा प्रकारच्या अन्य सर्व प्रकरणांमध्ये देखील व्याजासह देय रक्कम अदा करावी.

# ७ विनियम आणि कार्यप्रणाली निर्देश

## ७.१ विनियम

आयोगाकडून, विद्यमान विनियमांमध्ये सुधारणा करण्यासह, सर्व विनियमांवर जनतेकडून अभिप्राय मागविण्याच्या प्रक्रियेनंतर सदर विनियम महाराष्ट्र सरकारच्या शासकीय राजपत्रामध्ये अधिसूचित करण्यात आले. आयोगाने आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये खालील विनियम अधिसूचित केले:

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक ( पीव्ही ) यंत्रणांकरिता नक्त मापन ) विनियम, २०१५ ( १०.९.२०१५ रोजी अधिसूचित )**

पूर्वीच्या याचिका, अभ्यास अहवाल, केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सीइए) विनियमांमधील सहाय्यकारी सुधारणा आणि केंद्र सरकार व काही राज्य आयोगांकडून छपरावरील सौर ऊर्जेच्या निर्मितीस देण्यात आलेली चालना, या पार्श्वभूमीवर, आयोगाने, ग्राहकांनी त्यांच्या जागेतील छपरावर किंवा अन्य ठिकाणी केलेल्या सौर ऊर्जा निर्मितीच्या नक्त मापनासाठी विनियम अधिसूचित केले.

या विनियमांतर्गत, ग्राहक १ मेगावॅट क्षमतेपर्यंत सौर पीव्ही वीज निर्मिती यंत्रणा स्थापित करु शकेल आणि स्वत:ची संपूर्ण किंवा अंशत: विजेची गरज भागविण्यासाठी वीज वितरण परवानाधारकाच्या विद्युत जाळ्याशी जोडणी करु शकेल, परंतु यासाठी वितरण रोहित्रावरील भार ४० टक्क्यांपेक्षा जास्त नसावा. प्रत्येक आर्थिक वर्षाच्या अखेरीस, त्या वर्षादरम्यान ग्राहकाने निर्मिती केलेल्या सौर विजेचे असमायोजित नक्त जमा युनिट्स वितरण परवानाधारकाकडून त्याच्या सरासरी वीज खरेदी दराने (एपीपीसी) खरेदी करण्यात येतील.

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती ) विनियम, २०१५ ( १०.११.२०१५ रोजी अधिसूचित )**

सदर विनियम, जनतेच्या अभिप्रायानंतर, अधिसूचित करण्यात आले व त्यांनी आधीच्या २०१० च्या विनियमांना बदलण्यात आले आहे. हे विनियम आर्थिक वर्ष २०१५-१६ ते २०१९-२० पर्यंतच्या पाच वर्षांसाठी लागू राहतील. या विनियमांमध्ये पवन, लघु जल-विद्युत, बायोमास, अ-खनिज इंधनावर आधारित सह-निर्मिती प्रकल्प, सौर पीव्ही आणि सौर औष्णिक विद्युत प्रकल्प यासारख्या विविध नूतनशील ऊर्जा स्त्रोतांसाठी आयोगाने करावयाच्या सामान्य (जेनेरिक) वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अटी आणि शर्ती विनिर्दिष्ट करण्यात आल्या आहेत.

या विनियमांतर्गत पवन आणि सौर ऊर्जा इ. वर आधारीत नूतनशील ऊर्जा प्रकल्पांसाठी वीज दराची रचना एकल भागाची असून त्यामध्ये भागभांडवलावरील परतावा, कर्ज भांडवलावरील व्याज, घसारा, खेळत्या भांडवलावरील व्याज आणि संचालन व देखभाल खर्चाचा (ओ ॲण्ड एम) समावेश असलेल्या स्थिर खर्चाच्या घटकांचा समावेश आहे. बायोमास आणि अ-खनिज इंधनावर आधारित सह-निर्मिती सारख्या इंधन खर्चाच्या घटकाचा समावेश असलेल्या नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानासाठीच्या सामान्य (जेनेरिक) वीज दरामध्ये स्थिर खर्च आणि अस्थिर इंधन खर्च या दोन्ही घटकांचा समावेश आहे. या विनियमांमध्ये पवन ऊर्जा प्रकल्पांच्या पुनर्-ऊर्जीकरणासाठी (रिपॉवरिंग) नव्याने तरतुदी करण्यात आल्या आहेत.

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( बहु-वर्षीय वीज दर ) विनियम, २०१५ ( ८.१२.२०१५ रोजी अधिसूचित )**

हे विनियम, आर्थिक वर्ष २०१६-१७ ते २०१९-२० पर्यंतच्या चार वर्षांच्या तिसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी निर्मिती कंपन्या, वितरण परवानाधारक, पारेषण परवानाधारकांच्या वीज दरांचे आणि एमएसएलडीसीच्या शुल्क व आकारांचे निश्चितीकरण करण्यासाठी लागू राहतील.

हे विनियम आणि आधीचे सन २०११ चे विनियम या दोहोंमधील काही मुख्य फरक खालीलप्रमाणे आहेत:

| अ.क्र. | मापदंड | बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ | बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०१५ |
|---|---|---|---|
| १. | नियंत्रण कालावधी | ५ वर्षे<br>(आर्थिक वर्ष २०११-१२ ते २०१५-१६) | ४ वर्षे<br>(आर्थिक वर्ष २०१६-१७ ते २०१९-२०) |
| २. | वीज दरात सुधारणा | नियंत्रण कालावधीच्या ४थ्या वर्षापासून (मध्यावधी आढाव्यानंतर) | नियंत्रण कालावधीच्या ३ ऱ्या वर्षापासून (मध्यावधी आढाव्यानंतर) |
| ३. | व्यवसाय आराखड्यास पूर्व मंजुरी | बंधनकारक | काढून टाकण्यात आली |
| ४. | मध्यावधी आढावा | २.५ वर्षांनंतर | १.५ वर्षांनंतर |
| ५. | परवानाधारक /वीज निर्माते आणि ग्राहक यांच्यामध्ये कार्यक्षमतेतील वाढ आणि घट यांची विभागणी | फायदा :<br>१/३ (ग्राहकांना) सूट म्हणून देण्यासाठी आणि २/३ वीज निर्माता किंवा परवानाधारकाने वापरण्यासाठी<br>तोटा:<br>१/३ वीज दरामध्ये अतिरिक्त आकार म्हणून ग्राहकांवर लावण्यासाठी आणि २/३ वीज निर्माता किंवा परवानाधारकाने सहन करण्यासाठी | फायदा :<br>२/३ (ग्राहकांना) सूट म्हणून देण्यासाठी आणि १/३ वीज निर्माता किंवा परवानाधारकाने वापरण्यासाठी<br>तोटा:<br>१/३ वीज दरामध्ये अतिरिक्त आकार म्हणून ग्राहकांवर लावण्यासाठी आणि २/३ वीज निर्माता किंवा परवानाधारकाने सहन करण्यासाठी |
| ६. | येणे असलेले व्याज / देणे असलेले व्याज | ठरवून देण्यात आलेले नाही | स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय)चा आधारभूत दर अधिक १५० बेसिस अंश |
| ७. | खेळत्या भांडवलासाठी व्याजाचा दर | एसबीआयच्या अग्रिम दराने | स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) चा आधारभूत दर अधिक १५० बेसिस अंश |
| ८. | ग्राहक सुरक्षा अनामतीसाठी व्याजाचा दर | बँक दराने | स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय)चा आधारभूत दर अधिक १५० बेसिस अंश |
| ९. | संचालन व देखभाल खर्चासाठी वृद्धी दर | ५.७२ % प्रति वर्षी | घाऊक किंमत निर्देशांक आणि ग्राहक किंमत निर्देशांकावर अनुक्रमे ६०% आणि ४०% भारांकन देऊन व त्यातून १% कार्यक्षमता घटक कमी करुन आलेला चलनवाढीचा घटक |

| अ.क्र. | मापदंड | बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ | बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०१५ |
|---|---|---|---|
| १०. | विद्यमान वितरण परवानाधारकांसाठी संचालन व देखभाल निकष | विक्री/वहन केलेली ऊर्जा, ग्राहकांची संख्या आणि एकूण स्थिर मत्ता यांच्याशी जोडलेले निकष विनिर्दिष्टित | निकषांऐवजी, विद्यमान वीज निर्मिती व्यवसायांप्रमाणे, मागील ३ वर्षांच्या संचालन व देखभाल खर्चाच्या सरासरीवर आधारित तत्वे विनिर्दिष्टित |
| ११. | औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रांकरिता ऊर्जा आकार निश्चित करण्यासाठी एकूण कॅलरीफिक मूल्य (जीसीव्ही) | 'प्रज्वलित तत्वावर' आधारित | कोळशाच्या यार्डमधील अनलोडींगच्या ठिकाणी प्राप्त झालेला कोळसा, वजा प्रत्यक्ष स्टॉकिंग तोटा (१५० किलो कॅलरी/किलोग्रॅमपर्यंत) |

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वायुवर आधारित विद्युत निर्मिती क्षमतेच्या वापरासाठीच्या योजनेचे कार्यान्वयन) विनियम, २०१६ (२०.१.२०१६ रोजी अधिसूचित)**

भारत सरकारच्या विद्युत मंत्रालयाने ओ.एम.क्र.४/२/२०१५-टीएच-१, अन्वये, दिनांक २७ मार्च, २०१५ रोजी मंजूर केलेल्या वायुवर आधारित विद्युत निर्मिती क्षमतेच्या वापरासाठीच्या योजनेच्या कार्यान्वयाला मदत करण्यासाठी हे विनियम अधिसूचित करण्यात आले.

या विनियमांद्वारे, शासनाच्या योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या वायुवर आधारित वाढीव वीज निर्मितीकरिता महाराष्ट्रामध्ये पारेषण आकार आणि पारेषण हानिमधून २०१५-२०१६ आणि २०१६-१७ या दोन आर्थिक वर्षांकरिता सूट देण्यात आली आहे.

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१६, (दि.३०.३.२०१६ रोजी अधिसूचित)**

या विनियमांनी पूर्वीचे २०१० चे विनियम बदलण्यात आले आहेत. हे विनियम, नवीन बहु-वर्षीय वीज दर विनियम आणि नूतनशील ऊर्जा वीज दर विनियमांच्या धर्तीवर, आर्थिक वर्ष २०१६-१७ ते २०१९-२० पर्यंतच्या चार वर्षांसाठी लागू आहेत.

या विनियमांद्वारे, वितरण परवानाधारक आणि अन्य बंधन असलेल्या व्यक्ती/संस्थांनी, एका वर्षात सर्व स्त्रोतांपासून खरेदी केलेल्या एकूण विजेपैकी पात्र नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून निर्माण झालेल्या विजेची खरेदी, खालील तक्त्यात नमूद केलेल्या टक्केवारीच्या मर्यादेपर्यंत करणे आवश्यक राहील :

| वर्ष | नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून करावयाच्या वीज खरेदीचे परिमाण (टक्केवारीत व युनिट्समध्ये) | | |
|---|---|---|---|
| | सौर | बिगर-सौर (अन्य नूतनशील ऊर्जा) | एकूण |
| | (ए) | (बी) | (सी) |
| २०१६-१७ | १.०० % | १०.०० % | ११.०० % |
| २०१७-१८ | २.०० % | १०.५० % | १२.५० % |
| २०१८-१९ | २.७५ % | ११.०० % | १३.७५ % |
| २०१९-२० | ३.५० % | ११.५० % | १५.०० % |

पूर्वीच्या विनियमांप्रमाणे, नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या (आरपीओ) लक्ष्यांकाची पूर्तता, नूतनशील उर्जेची खरेदी किंवा नूतनशील ऊर्जा खरेदीची प्रमाणपत्रे (आइसी) खरेदी करुन, करता येतील. तथापि, ते पूर्वी असलेल्या लक्ष्यांकांपेक्षा खूपच जास्त आहेत.

पूर्वीच्या २०१० च्या विनियमांच्या तुलनेत या विनियमांमधील मुख्य फरक खालीलप्रमाणे आहेत :

१) ५ मेगावॅट पर्यंत स्थापित क्षमता किंवा ५ एमव्हीए पर्यंत करारांतर्गत मागणी (पूर्वीच्या अनुक्रमे १ मेगावॅट आणि १ एमव्हीए) असलेल्या बंधन असलेल्या व्यक्ति किंवा संस्थांना सध्या तरी आरपीओचे लक्ष्यांक लागू नाहीत.

२) १० मेगावॅट पर्यंत स्थापित क्षमता असलेल्या स्व-वापरासाठीच्या निर्मिती प्रकल्पाचे उपयोगकर्ते आणि १० एमव्हीए पर्यंत करारांतर्गत मागणी असलेल्या मुक्त प्रवेश ग्राहकांनी, वेगळया सौर आणि बिगर सौर आरपीओ लक्ष्यांकाऐवजी, एकूण आरपीओ लक्ष्यांक साध्य करणे आवश्यक आहे.

३) वितरण परवानाधारक, प्रयत्न करुन देखील त्याचे मिनी/मायक्रो जल-विद्युत लक्ष्यांक साध्य करु शकत नसतील तर ते बिगर-सौर आरइसी खरेदी करुन कमी पडणारे लक्ष्यांक साध्य करु शकतील.

४) आरपीओ लक्ष्यांकांच्या पूर्ततेसाठी विचारात घेण्याकरीता, नूतनशील ऊर्जेची खरेदी आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या वीज दराने (किंवा विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३ अंतर्गत, केंद्र सरकारकडून पारीत करण्यात येईल त्या स्पर्धात्मक बोलीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार) करणे आवश्यक आहे. तथापि, आरपीओचे लक्ष्यांक पूर्ण करण्यासाठी पात्र म्हणून विचारात घेण्याकरिता, वितरण परवानाधारकाला, नवीन आणि नूतनशील ऊर्जा मंत्रालयाने मान्यता दिलेल्या योजने अंतर्गत अन्य दराने, वीज खरेदी करणे शक्य व्हावे यासाठी एका परंतुकाची भर घालण्यात आली आहे.

५) केंद्र सरकारने अधिसूचित केलेल्या वीज दर धोरण, २०१६ मधील तरतुदी विचारात घेऊन, आधीच्या विनियमांमध्ये खनिज इंधनावर आधारित सह-निर्मितीच्या स्व-वापरासाठीच्या उपयोगकर्त्यांना दिलेली सूट काढून टाकण्यात आली आहे.

नवीन विनियमांसाठीच्या कारणांचे सविस्तर निवेदन आयोगाच्या संकेत-स्थळावर देण्यात आले आहे.

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( वितरण मुक्त प्रवेश ) विनियम, २०१६ ( दि. ३०.३.२०१६ रोजी अधिसूचित )**

या विनियमांनी आधीचे २०१४ चे विनियम बदलण्यात आले आहेत. पारेषण आणि वितरण यंत्रणा आणि संबंधित सुविधा यांमध्ये भेदभावरहित मुक्त प्रवेश देण्यासंबंधातील विद्युत अधिनियम, २००३ च्या तरतुदी अंमलात आणणे हा या विनियमांचा उद्देश आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश)विनियम, २०१६ मधील प्रमुख तरतुदी खालीलप्रमाणे आहेत :

एक) वितरण परवानाधारकाकडे १ मेगावॅट आणि त्यापेक्षा जास्त करारांतर्गत मागणी असलेले ग्राहक खालील एक किंवा अधिक विद्युत कंपन्यांकडून किंवा त्यांच्या संयोगाकडून (कॉम्बिनेशन) विजेचा पुरवठा घेण्यासाठी मुक्त प्रवेशास पात्र असतील.

अ) स्व-वापरासाठीच्या निर्मिती संयत्रासह निमिती संयत्रे किंवा केंद्रे,

ब) वीज व्यापार परवानाधारक

क) पॉवर एक्स्चेंजेस

ड) अन्य वितरण परवानाधारक

इ) कोणतेही अन्य स्त्रोत.

दोन) ज्या वितरण परवानाधारकाच्या पुरवठा क्षेत्रात ग्राहक किंवा वीज निर्माता स्थित असेल तो वितरण परवानाधारक वितरण यंत्रणेत मुक्त प्रवेश आणि जोडणीसाठी नोडल एजन्सी राहील. नोडल एजन्सीकडे अर्ज करण्यात येतील, ही नोडल एजन्सी यामध्ये सहभागी असलेल्या अन्य संस्थांशी समन्वय साधून अर्जाची छाननी करील.

तीन) संबंधित वितरण परवानाधारकाच्या यंत्रणेमध्ये शिल्लक क्षमता उपलब्ध असण्याच्या अटीच्या अधीन राहून, डे-अहेड मुक्त प्रवेशास (जो २०१४ च्या विनियमांमध्ये अभिप्रेत नव्हता) पुन्हा सुरुवात करण्यात आली आहे.

चार) करारांतर्गत मागणीत सुधारणा करण्याचा पर्याय मुक्त प्रवेश ग्राहकासमोर खुला असेल आणि त्याचे नियमन विद्युत पुरवठा संहिता व कृतीची मानके विनियमांतील तरतुदींनी करण्यात येईल. तथापि, अल्प-कालिन मुक्त प्रवेश मागणाऱ्या ग्राहकाला मुक्त प्रवेश कालावधीदरम्यान त्याच्या करारांतर्गत मागणीमध्ये सुधारणा करता येणार नाही, परंतु त्यासाठी अर्ज करण्याच्या वेळी तो अशी सुधारणा करु शकेल.

पाच) अनेक वीज निर्मात्यांकडून वीज मिळविण्यास परवानगी देण्यात आली आहे, (जी २०१४ च्या विनियमांमध्ये मर्यादित प्रमाणात होती).

सहा) 'अ-निश्चित' नूतनशील ऊर्जा निर्मितीपासूनच्या शिल्लक उर्जेच्या बॅंकिंगची तरतूद पुन्हा करण्यात आली आहे (ज्यास २०१४ च्या विनियमांमध्ये परवानगी नव्हती). समायोजनानंतर शिल्लक उर्जा वितरण परवानाधारकाकडे बॅंक करता येईल. बॅंकिंग आकारांचे समायोजन हे वस्तुरुपात बॅंक केलेल्या ऊर्जेच्या २ टक्के दराने करण्यात येईल.

सात) वर्षाच्या सर्व बाराही महिन्यात उर्जेचे बॅंकिंग करण्यात परवानगी देण्यात आली असली तरी एप्रिल, मे, ऑक्टोबर आणि नोव्हेंबर या महिन्यांत बॅंक केलेल्या ऊर्जेसाठी क्रेडीट देण्यात येणार नाही. अन्य महिन्यात बॅंक केलल्या ऊर्जेसाठी क्रेडिट हे संबंधित दिवसाच्या काल-गटात (टी ओ डी) अंत:क्षेपण केलेल्या उर्जेनुसार राहील.

आठ) आर्थिक वर्षाच्या शेवटी बॅंक केलेल्या ऊर्जेपैकी अविनियोगित ऊर्जा, नूतनशील ऊर्जा निर्मात्याने अशा आर्थिक वर्षात प्रत्यक्ष केलेल्या निर्मितीच्या १० टक्क्यांपर्यंतच्या मर्यादेत असलेली, वितरण परवानाधारकाने त्या वर्षाकरीता सरासरी वीज खरेदीच्या दराने केलेली मानीव खरेदी म्हणून विचारात घेण्यात येईल.

नऊ) मुक्त प्रवेशासाठी निर्मिती केंद्रे आणि ग्राहक या दोन्ही ठिकाणी विशेष ऊर्जा मीटर्स (स्पेशल एनर्जी मीटर्स) बसवण्याची पूर्व-अट कायम ठेवत असताना, या मीटर्सची खरेदी, मीटर्स बसविणे आणि त्यांच्या चाचणीसाठीची कार्यपध्दत, पर्याय आणि वेळेची चौकट स्पष्ट करण्यात आली आहे.

दहा) संबंधित वीज निर्माते किंवा ग्राहकांना मुक्त प्रवेशासाठी अर्ज करता येईल.

नवीन विनियमांसाठीच्या कारणांचे सविस्तर निवेदन आयोगाच्या संकेत-स्थळांवर देण्यात आले आहे.

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( पारेषण मुक्त प्रवेश ) विनियम, २०१६ ( दि.३०.३.२०१६ रोजी अधिसूचित )**

या विनियमांनी पूर्वीचे २०१४ चे विनियम बदलण्यात आले. या विनियमांमधील प्रमुख तरतुदी खालीलप्रमाणे आहेत :

(एक) खालील व्यक्ति व संस्था राज्यांतर्गत पारेषण यंत्रणमध्ये मुक्त प्रवेशासाठी अर्ज करण्यास पात्र राहतील :-

(अ) महाराष्ट्रातील निर्मिती केंद्र जिच्या मालकीचे आहे किंवा ती ते चालवित असेल किंवा जिची त्याचे मालक बनण्याची किंवा ते चालविण्याचा उद्देश असेल, अशी निर्मिती कंपनी;

(ब) आयोगाच्या विनियमांनुसार मुक्त प्रवेश मिळविण्यास पात्र असलेला ग्राहक ;

(क) वितरण परवानाधारक; आणि

(ड) परवानाधारक वीज व्यापारी.

दोन) परवानाधारक वीज व्यापारी वगळता, कोणतीही पात्र विद्युत कंपनी जोडणीयता आणि दीर्घ-कालिन किंवा मध्यम-कालिन मुक्त प्रवेशासाठी एकाच वेळी अर्ज करु शकेल.

तीन) राज्य पारेषण कंपनी (एसटीयु) ही राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत जोडणीयता, दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश आणि मध्यम-कालिन मुक्त प्रवेश मंजूर करण्यासाठी नोडल एजन्सी राहील. महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र (एमएसएलडीसी) ही अल्प-कालिन मुक्त प्रवेश मंजूर करण्यासाठी नोडल एजन्सी राहील.

चार) पारेषण यंत्रणेमध्ये शिल्लक क्षमता उपलब्ध असेल तर, डे-अहेड मुक्त प्रवेशाला परवानगी देण्यात येईल.

पाच) १ मेगावॅट किंवा अधिक मागणी असलेले ग्राहक आणि सर्व निर्मिती केंद्रे - त्यांची क्षमता कितीही असली तरी, यांच्याबाबतीत राज्यांतर्गत मुक्त प्रवेशाच्या व्यवहारांचे काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राकडून राज्य ग्रिड संहितेनुसार करण्यात येईल.

सहा) आयोगाने वेळोवेळी निश्चित केलेली मान्यताप्राप्त राज्यांतर्गत पारेषण हानि विजेचा खरेदीदार सहन करील आणि ऊर्जेची हिशोबपूर्ती ही राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतील प्रमाणकानुसार हानिवर आधारीत असेल.

नवीन विनियमांसाठीच्या कारणांचे सविस्तर निवेदन आयोगाच्या संकेत-स्थळांवर देण्यात आले आहे.

## ७.२ कार्यप्रणाली निर्देश

**विजेचा पुरवठा देण्यासाठीचा कालावधी कमी करण्यासाठी कार्यप्रणाली निर्देश ( २०.४.२०१५ )**

विद्युत अधिनियम, २००३च्या तरतुदीसह आयोगाच्या पुरवठा संहिता विनियमांतर्गत, विद्यमान विद्युत जाळयातून विजेचा पुरवठा करणे शक्य असल्यास, वितरण परवानाधारकाने अर्ज मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत नवीन जोडणी देणे आवश्यक आहे. या कालावधीनंतर, कृतीची मानके विनियमांतर्गत नुकसानभरपाईसाठी मागणी करता येईल.

महाराष्ट्र सरकार आणि वितरण परवानाधारक यांच्यामध्ये, व्यवसाय सुलभतेने करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या सुधारणांच्या संदर्भात, किमान मुंबईत कमी कालावधीत विजेचा पुरवठा करण्याच्या प्रश्नावर, चर्चा झाली होती. या चर्चेच्या परिणामस्वरुप, आयोगाने विद्युत पुरवठा संहितेअंतर्गत खालील कार्यप्रणाली निर्देश निर्गमित केले :

*"सांविधिक परंतुकांच्या अधीन राहून, बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या क्षेत्रातील सर्व वर्गवारीतील ग्राहकांना, सर्वार्थाने परिपूर्ण भरलेले अर्ज प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, नवीन जोडणी देण्याचा आणि विजेचा पुरवठा करण्याचा वितरण परवानाधारक प्रयत्न करतील.*

*बृहन्मुंबई महानगर पालिका क्षेत्रातील त्यांचा अनुभव विचारात घेऊन, वितरण परवानाधारक महाराष्ट्रातील अन्य क्षेत्रात, त्या ठिकाणाच्या प्रत्यक्ष परिस्थितीनुसार, ही योजना राबविण्याचा प्रयत्न करतील."*

**ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाने आपल्या स्वत:च्या आदेशांचे पुनर्विलोकन करण्यासंबंधातील कार्यप्रणाली निर्देश ( ८.२.२०१६ )**

आयोगाच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, एका ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाने, त्याने स्वत: दिलेल्या आदेशांचे पुनर्विलोकन करण्यासाठी वितरण परवानाधारकांनी केलेले अर्ज हाताळले होते. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल) विनियम, २००६ मध्ये मंचांनी स्वत: दिलेल्या आदेशांचे पुनर्विलोकन करण्याचा अधिकार त्यांना देण्यात आलेला नाही. त्यामुळे, आयोगाने खालील कार्यप्रणाली निर्देश निर्गमित केले :

१. *"ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांना असे निर्देश देण्यात येत आहेत की, कोणत्याही पक्षकाराकडून त्यांच्या स्वत:च्या आदेशांच्या पुनर्विलोकनासाठी करण्यात आलेले अर्ज त्यांनी हाताळू नयेत.*

२. *ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाने असा कोणताही अर्ज हाताळण्याचा किंवा स्वत:च्या आदेशाचे पुनर्विलोकन करण्याची कोणतीही घटना निदर्शनास आल्यास, विद्युत लोकपाल स्वत:हून संबंधित कागदपत्रे मागवून घेईल आणि उचित निर्देश देईल.*

३. *वितरण परवानाधारकाने केलेल्या अर्जावर ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाने स्वत:च्या आदेशाचे पुनर्विलोकन केले किंवा असे अर्ज हाताळले तर ग्राहक, विद्युत लोकपालाकडे दाद मागू शकेल."*

# ८. ग्राहक गाऱ्हाणे निवारण यंत्रणा

विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(५) आणि ४२(६) आणि संबंधित विनियमांतर्गत (ज्याची पहिली आवृत्ती, विद्युत अधिनियम २००३ अंमलात आल्यानंतर ६ महिन्यांनी, डिसेंबर, २००३ मध्ये अधिसूचित करण्यात आली होती) वितरण परवानाधारकांनी ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच (सीजीआरएफ), ज्यामध्ये अध्यक्ष आणि दोन सदस्य आहेत, स्थापन केले आहेत आणि विद्युत लोकपाल यांची नियुक्ती आयोगाने केली आहे. या यंत्रणेंतर्गत ग्राहकांना त्यांच्या गाऱ्हाण्यांचे निवारण आणि काही प्रकरणांत नुकसानभरपाई न्यायालयात न जाता प्राप्त करुन घेणे शक्य झाले आहे.

## ८.१ ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच

आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये महाराष्ट्रात २१ ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच कार्यरत होते त्यापैकी १७ मंच हे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने स्थापन केले आहेत आणि उर्वरित मंच बेस्ट, आरइन्फ्रा-वितरण आणि टाटा पॉवर कंपनी-वितरण आणि माईंडस्पेस बिझनेस पार्क प्रा. लि. (एमबीपीपीएल - एक मानीव वितरण परवानाधारक) या अन्य वितरण परवानाधारकांनी स्थापन केले आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल) विनियम २००६ अंतर्गत, या मंचाचा एक सदस्य, जो ग्राहक संस्थांचे प्रतिनिधित्व करतो, आयोगाकडून नामनिर्देशित करण्यात येतो. परवानाधारकाने नेमावयाच्या अध्यक्षांचे पात्रता निकष ठरवून देण्यात आले आहेत. तिसरा सदस्य परवानाधारकाचे प्रतिनिधित्व करतो.

आर्थिक वर्ष २०१५-१६ मधील ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांच्या कामगिरीची थोडक्यात माहिती खालील अ ते ड या तक्त्यांमध्ये देण्यात आली आहे :-

### तक्ता अ

**महावितरण कंपनीच्या ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांना प्राप्त झालेली गाऱ्हाणी**

| अक्र. | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाचे नाव (परिमंडल) | सुरुवातीच्या दिनांकास प्रलंबित असलेल्या तक्रारींची संख्या | प्राप्त झालेल्या झालेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | दाखल न करुन घेतलेल्या किंवा मागे घेतलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | कार्यवाही योग्य गाऱ्हाण्यांची संख्या | निवारण केलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | | निवारण केलेल्या एकूण गाऱ्हाण्यांची संख्या | २०१४-१५ च्या अखेरीस प्रलंबित गाऱ्हाण्यांची संख्या | ग्राहकांच्या बाजूने निर्णय दिलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | परवानाधारकाच्या बाजूने निकाल दिलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ६० दिवसांच्या आत | ६० दिवसांच्या नंतर | | | | |
| १ | अमरावती | १ | ७ | ० | ८ | ५ | १ | ६ | २ | ६ | ० |
| २ | औरंगाबाद | १३ | २५ | २ | ३६ | २२ | ० | २२ | १४ | १३ | ९ |
| ३ | भांडूप | ८७ | ८३ | ० | १७० | ९ | ६६ | ७५ | ९५ | ४८ | २७ |
| ४ | कल्याण | २२२ | २१२ | ० | ४३४ | २३ | ४५ | ६८ | ३६६ | ४३ | २५ |
